सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २४ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ११२ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## उपराष्ट्रपती पदाच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात



नवी दिल्ली : जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर आता उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची औपचारिक प्रक्रिया सुरू झाली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने मंगळवारी जारी केलेल्या राजपत्राद्वारे धनखड यांच्या राजीनाम्याची अधिसूचना दिली होती.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत, भारतीय निवडणूक आयोगाला उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक घेण्याचा अधिकार आहे. ही निवडणूक राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक कायदा, १९५२ आणि राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक नियम, १९७४ अंतर्गत घेतली जाते.

निवडणूक आयोगाने नवीन उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. प्राथमिक तयारी पूर्ण होताच निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाईल. निवडणूक वेळापत्रक जाहीर करण्यापूर्वी मुख्य निवडणूक अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. आतापर्यंत झालेल्या सर्व उपराष्ट्रपती निवडणुकीची पार्श्वभूमी माहिती संकलित आणि प्रसिद्ध केली जाते. उपराष्ट्रपती पदासाठी निष्पक्ष, मुक्त आणि पारदर्शक निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पावले उचलली जात असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी उपराष्ट्रपती पदाचा जगदीप धनखड यांचा राजीनामा स्वीकारला. तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धनखड यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

भारताचे चौदावे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सोमवारी आरोग्याच्या कारणास्तव उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की ते आरोग्याला प्राधान्य देऊन तात्काळ पद सोडत आहेत. भाजपने १६ जुलै २०२२ रोजी धनखड यांना उपराष्ट्रपती पदासाठी एनडीएचे उमेदवार म्हणून घोषित केले. तर ६ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या निवडणुकीत त्यांनी विरोधी उमेदवार मार्गरेट अल्वा यांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता.

## केंद्राकडे लोकशाहीच्या प्रश्नांवर ठोस उत्तर नाही - राहुल गांधी

नवी दिल्ली, २३ जुलै : सरकार देशाच्या सुरक्षेशी, परराष्ट्र धोरणाशी आणि लोकशाहीच्या मूलभूत प्रक्रियांशी संबंधित प्रश्नांवर कोणतेही ठोस उत्तर देत नाही, असे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. ते आज बुधवारी संसद भवन संकुलात पत्रकार परिषदेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी परराष्ट्र धोरण, ऑपरेशन सिंदूर, मतदार यादीतील गोंधळ आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत सरकारवर अनेक गंभीर आरोप केले.

राहुल गांधी म्हणाले की, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलीकडील विधानाचा उल्लेख करत त्यांनी विचारले की, ट्रम्प यांनी २५ वेळा सांगितले की त्यांनी भारतात युद्धबंदी आणली, मग यावर सरकार किंवा पंतप्रधान मोदींनी अजूनही मौन का बाळगले आहे?

## महाराष्ट्रातील घाट परिसरात २५-२६ जुलै रोजी मुसळधार पावसाचा अंदाज

### नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांनी राहावे सतर्क

मुंबई : बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होत आहे. हा कमी दाबाचा पट्टा २७ जुलैपर्यंत मध्य प्रदेशात सरकण्याचा अंदाज आहे. यामुळे विदर्भात (प्रामुख्याने पूर्व विदर्भात) २५-२६ जुलैदरम्यान मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात देखील मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. विदर्भ लगतच्या पूर्व मराठवाड्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, तर उर्वरित मराठवाडा आणि खानदेशात देखील पावसाचा अंदाज आहे.

पूर्व आणि उत्तर विदर्भात सर्वाधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामध्ये भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती, आणि यवतमाळ जिल्ह्यांचा समावेश आहे. तसेच कोकणातील सर्वच जिल्हे; नाशिक, पुणे, आणि सातारा जिल्ह्यांतील घाट परिसरात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांमध्ये देखील यादरम्यान मध्यम ते जोरदार पाऊस पडू शकतो.


सध्याच्या अंदाजानुसार २६ तारखेला पावसाचे प्रमाण सर्वात अधिक असण्याची शक्यता आहे. २५-२६ जुलै दरम्यान पूर्व विदर्भात धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता नाकारता येत नाही; तर विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात काही प्रमाणात दरड कोसळणे, आणि सखोल भागांमध्ये पुराची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.

## गुजरात एटीएसने अल कायदाशी संबंधित चार संशयितांना केली अटक

गांधीनगर, २३ जुलै : गुजरात एटीएसने अल-कायदाशी संबंधित चार संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. या चारपैकी दोन जणांना गुजरातमधून, एकाला दिल्लीमधून आणि एकाला नोएडामधून अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात एटीएसचे डीआयजी सुनील जोशी यांनी माहिती दिली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे गुजरात एटीएसने झीशान, फर्दीन, सैफुल्ला आणि फारिक या चौघांना अटक केली असून या आरोपींचे वय २० ते २५ वर्षांच्या दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे.हे सर्वजण अल-कायदाच्या विचारसरणीचा प्रसार करत होते आणि काही काळापासून सक्रिय होते. गुजरात एटीएसला या प्रकरणात एक गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर सखोल चौकशी आणि एक विशेष ऑपरेशन राबवून त्यांना अटक करण्यात आली. एटीएसच्या माहितीनुसार, हे दहशतवादी सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांना आपल्या गटात सामील करत होते आणि त्यात अल-कायदाचे प्रचार करत होते. त्यांनी मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ल्याची योजना आखली होती, असा दावा करण्यात येत आहे. चौकशीत असेही आढळले की हे सर्वजण गुजरातमधील दहशतवादी हालचालींवर चर्चा करत होते आणि या अनुषंगानेच त्यांना अटक करण्यात आली आहे. गुजरात एटीएसने या चारही संशयितांना अटक केली असून त्यांची सखोल चौकशी सुरू आहे.

## नितीन गडकरी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



पुणे: केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना २०२५ चा प्रतिष्ठित लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार , लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने हा सन्मान प्रदान केला जाईल.

शुक्रवार, १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांच्या १०५ व्या पुण्यतिथीनिमित्त सकाळी १०:३० वाजता टिळक स्मारक मंदिरात होणाऱ्या विशेष सोहळ्यात गडकरींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी नुकतंच पत्रकार परिषद घेत याबद्दलची माहिती घेतली. यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. डॉ. रोहित टिळक यांच्या हस्ते आणि या मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होईल.

या सोहळ्यात टिळक महाविद्यालयाच्या कुलगुरू व टिळक स्मारक ट्रस्टच्या विश्वस्त डॉ. गीताली टिळक, टिळक महाविद्यालय ट्रस्टच्या आणि टिळक स्मारक ट्रस्टच्या विश्वस्त डॉ. प्रणती रोहित टिळक, विश्वस्त रामचंद्र नामजोशी, विश्वस्त सरिता साठे हेही उपस्थित राहणार आहेत.

पुरस्काराचे स्वरूप

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारात स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये रोख रक्कम असे स्वरूप आहे. १९८३ पासून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पहिला पुरस्कार एस.एम. जोशी यांना प्रदान करण्यात आला होता. आजवर अनेक दिग्गजांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

## ऑस्ट्रेलियात भारतीय विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला; एकाला अटक

कॅनबेरा, २३ जुलै : ऑस्ट्रेलियातील ॲडलेड शहरात एका भारतीय विद्यार्थ्यावर पाच जणांच्या गटाने क्रूर हल्ला केल्याप्रकरणी आता एकाला अटक करण्यात आली असून उर्वरितांचा शोध सुरू आहे. भारतीय विद्यार्थ्यावरील हल्ल्याचा निषेध व्यक्त केला जात असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. पोलिसांनी याप्रकरणी, एनफिल्डमध्ये एका २० वर्षीय तरुणाला अटक करण्यात आल्याची माहिती दिली. इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी लोकांची मदत मागितली आहे. या हल्ल्यामुळे ॲडलेडमधील भारतीय समुदाय संतप्त झाला आहे. चरणप्रीतच्या समर्थनार्थ अनेक लोक एकत्र आले आहेत आणि त्यांनी या हिंसाचारावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चरणप्रीत सिंग शनिवारी (दि.१९) त्याच्या पत्नीसोबत शहरातील लाईट शो पाहण्यासाठी कारमधून बाहेर निघाला होता. यादरम्यान, रात्री ९ वाजता किंटोर अव्हेन्यूजवळ कार पार्किंगवरून त्याचा स्थानिकांशी वाद झाला. त्यांनी चरणप्रीतला वांशिक शिवीगाळ केली आणि त्याच्यावर हिंसक हल्ला केला. चरणप्रीत सिंगवर धारदार वस्तूंनी हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात चरणप्रीतला गंभीर दुखापत झाली आहे. हल्ल्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान, या हल्ल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ते मला भारतीयांनो पळून जा असं म्हटलं आणि नंतर मला लाथा आणि मुक्का मारायला सुरुवात केली. मी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी मला बेशुद्ध होईपर्यंत मारहाण केली, असं चरणप्रीतने सांगितले.

## देशात सायबर गुन्हेगारीत प्रचंड वाढ, ५ वर्षांत दुपटीहून अधिक प्रकरणे!

नवी दिल्ली: भारतात सायबर गुन्हेगारीचा आलेख चिंताजनकरित्या वाढत असल्याचे समोर आले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या 'क्राईम इन इंडिया' अहवालानुसार, गेल्या पाच वर्षांत सायबर गुन्हेगारीच्या प्रकरणांमध्ये दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. केंद्रीय गृह राज्यमंत्री बांदी संजय कुमार यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही धक्कादायक आकडेवारी सादर केली.

छउठइ च्या आकडेवारीनुसार, २०१८ ते २०२२ या कालावधीत सायबर गुन्हेगारी (दूरसंवाद उपकरणांचा वापर करून केलेले गुन्हे) अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांचा तपशील असा:

२०१८ मध्ये २७,२४८
२०१९ मध्ये ४४,७३५
२०२० मध्ये ५०,०३५
२०२१ मध्ये ५२,९७४
२०२२ मध्ये ६५,८९३

या आकडेवारीवरून सायबर गुन्हेगारीचा चढता आलेख स्पष्ट दिसतो. विशेष म्हणजे, देशातील वृद्ध व्यक्तींनी (ज्येष्ठ नागरिकांनी) दाखल केलेल्या सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींची विशिष्ट आकडेवारी छउठइ द्वारे स्वतंत्रपणे नोंदवली जात नाही, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांवरील सायबर हल्ल्यांची खरी व्याप्ती अजूनही अस्पष्ट आहे.

भारतीय राज्यघटनेनुसार 'पोलिस' आणि 'सार्वजनिक सुव्यवस्था' या सेवा राज्याच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची कायदा अंमलबजावणी करणारी संस्था सायबर गुन्हे आणि वृद्धांवरील सायबर गुन्हे रोखण्यासाठी, शोधण्यासाठी, तपासण्यासाठी आणि खटला चालवण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार आहेत. मात्र, केंद्र सरकार राज्यांना या क्षमता विकासासाठी विविध योजनांअंतर्गत सल्लामसलत आणि आर्थिक सहाय्य पुरवते. ज्येष्ठ नागरिकांवरील सायबर गुन्ह्यांसह सर्व प्रकारच्या सायबर गुन्ह्यांशी सर्वसमावेशक आणि समन्वयात्मक पद्धतीने सामना करण्यासाठी केंद्र सरकारने अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत, ज्यात खालील प्रमुख गोष्टींचा समावेश आहे.

भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र : देशातील सर्व प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचा समन्वयाने निपटारा करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने 'भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र' ची स्थापना केली आहे.

राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल : I4C चा भाग म्हणून 'राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल' (https://cybercrime.gov.in) सुरू करण्यात आले आहे, जिथे नागरिक सायबर गुन्ह्यांची तक्रार करू शकतात.

नागरिक वित्तीय सायबर घोटाळा रिपोर्टिंग आणि व्यवस्थापन प्रणाली : आर्थिक फसवणुकीची तात्काळ माहिती मिळावी आणि फसवणूक करणाऱ्यांकडून पैसा पळवला जाऊ नये, यासाठी २०२१ साली ख४उ अंतर्गत ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

## हॉलिवूडचे प्रसिद्ध गायक जॉन मायकल 'ओझी ऑस्बोर्न' यांचं निधन



लंडन, २३ जुलै : हॉलिवूडचे प्रसिद्ध गायक जॉन मायकल 'ओझी ऑस्बोर्न' यांचं निधन झालं आहे. ते ७६ वर्षांचे होते. ब्रिटीश हेवी मेटल बँड ब्लॅक सब्बाथचे ते मुख्य गायक होते. तसंच संगीतकारही होते.याच बँडमुळे त्यांना 'प्रिंस ऑफ डार्कनेस' ही ओळख मिळाली. त्यांच्या निधनाने हॉलिवूड आणि संगीत जगतावर शोककळा पसरली असून बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहनेही दुःख व्यक्त केले आहे. ओझी ऑस्बॉर्न यांच्या निधनाने बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहही हळहळला आहे. त्याने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर ओझी ऑस्बॉर्नचा एक फोटो शेअर करत दुःख व्यक्त केलं आहे. मीडिया रिपोर्टनुसार, ओझी ऑस्बोर्न काही वर्षांपासून पार्किंसन आजारामुळे त्रस्त होते. २२ जुलै रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ओझी यांच्या कुटुंबाने अधिकृत स्टेटमेंट जारी करत सांगितले, हे सांगताना अत्यंत दुःख होत आहे की आपले प्रिय ओझी ऑस्बोर्न आता आपल्यात नाहीत. सकाळीच त्यांचं निधन झालं. त्यांच्याजवळ त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. त्यांना शेवटपर्यंत कुटुंबाचं प्रेम मिळालं. या प्रसंगी त्यांच्या कुटुंबाला प्रायव्हसी द्यावी अशी विनंती.२०१९ साली त्यांना पार्किंसन रोगाचं निदान झालं होतं. मात्र आता त्यांचं निधन कशामुळे झालं याचं कारण समोर आलेलं नाही. ओझी ऑस्बोर्न यांनी दोन आठवड्यांपूर्वीच रॉक बँड ब्लॅक सब्बाथच्या शेवटच्या संगीत समारोहावेळी परफॉर्म केले होते. या सोहळ्याचं नाव 'बॅक टू द बिगिनिंग' असं होतं. ही कॉन्सर्ट बँडचे होमग्राऊंड बर्किंघममध्ये ठेवण्यात आलं होतं. ओझी यांचं जाणं संगीत जगताची मोठी हानी आहे.

## 'एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'तर्फे भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा सन्मान

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे रक्तदानाच्या महायज्ञाची विक्रमी नोंद



मुंबई, २३ जुलै - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक भान ठेवत भारतीय जनता पार्टीतर्फे मंगळवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरांनी दोन विश्व विक्रम प्रस्थापित केले. या महारक्तदान उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झाली असून त्याबद्दल एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या प्रतिनिधींनी बुधवारी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना सन्मानित केले . एका दिवसात पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील सर्व १२२१ मंडलांमध्ये सर्वाधिक १०८८ रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचा आणि सर्वाधिक ७८ हजार ३१३ युनिट्स रक्ताचे संकलन, असे दोन विश्वविक्रम केल्याबद्दल एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या प्रतिनिधींनी श्री. चव्हाण यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले.

प्रदेश भाजपा आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी न्यासाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे वरिष्ठ परीक्षक संजय भोला, वरिष्ठ परिक्षक सीमा मन्नीकोट यांच्या हस्ते श्री. चव्हाण यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे,प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, राजेश पांडे , विजय चौधरी , मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे , माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवशी एकाच दिवशी झालेल्या महारक्तदान उपक्रमाने दोन जागतिक विक्रम केले ही पक्षासाठी अभिमानास्पद आणि आनंदाची बाब आहे. सातत्याने समाजासाठी काम करण्याच्या पक्ष संघटनेच्या शिकवणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अव्याहतपणे कार्य करत आहेत त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्याची संधी या शिबिरामुळे सर्वांना मिळाली .रक्तदात्यांनीही सामाजिक जाणीवा जागृत ठेवत रक्तदानाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना समर्पण भावाच्या शुभेच्छा दिल्या बद्दल श्री. चव्हाण यांनी रक्तदात्यांचे आभार मानले.संघटित शक्तीमुळेच रक्तदानाच्या या महायज्ञाने दोन विक्रमांना गवसणी घातली या शब्दांत कौतुक करत श्री. चव्हाण यांनी पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी , प्रदेश कार्यलायातील कर्मचारी यांच्या योगदानाची दखल घेतली. पक्षकार्यकर्त्यांचे हे यश असून मी भाजपा प्रदेशाध्यक्ष या नात्याने प्रतिनिधी म्हणून प्रशस्तीपत्राचा स्विकार केला असेही त्यांनी नमूद केले.

## पंतप्रधान ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर रवाना

नवी दिल्ली, २३ जुलै : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बुधवारी ब्रिटन आणि मालदीवच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना झाले. या भेटीमुळे द्विपक्षीय संबंध मजबूत होतील आणि ठोस परिणाम साध्य होतील अशी आशा व्यक्त केली जातेय.

पंतप्रधान दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात आज रात्री लंडनला पोहोचतील. ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदींचा हा चौथा ब्रिटन दौरा आहे. आपल्या प्रस्थान निवेदनात पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारत आणि ब्रिटनमधील व्यापक धोरणात्मक भागीदारीने अलिकडच्या काळात लक्षणीय प्रगती केली आहे. आमचे सहकार्य व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, नवोपक्रम, संरक्षण, शिक्षण, स्थिरता, आरोग्य आणि लोक-ते-लोक संबंधांमध्ये पसरलेले आहे.

नरेंद्र मोदी या दौऱ्यात पंतप्रधान स्टारमर यांच्यासोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत, ज्यामध्ये भारत-ब्रिटन मुक्त व्यापार कराराला (एफटीए) गती देण्यावर आणि आर्थिक भागीदारीला चालना देण्यावर चर्चा होईल, जेणेकरून दोन्ही देशांमध्ये समृद्धी, विकास आणि रोजगार निर्मितीला चालना मिळेल. यावेळी पंतप्रधान मोदी किंग चार्ल्स तिसरे यांची देखील भेट घेतील.

या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, पंतप्रधान मोदी मालदीवचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइझ्झू यांच्या निमंत्रणावरून २५ आणि २६ जुलै रोजी मालदीवचा दौरा करतील. मालदीवचा हा त्यांचा तिसरा दौरा आहे आणि राष्ट्राध्यक्ष मुइझ्झू यांच्या कार्यकाळातील राष्ट्रप्रमुखांचा हा पहिलाच दौरा आहे.

उल्लेखनीय म्हणजे, पंतप्रधान मोदी २६ जुलै रोजी मालदीवच्या ६० व्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, ऑक्टोबर २०२४ मध्ये स्वीकारलेल्या 'व्यापक आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागीदारी'च्या दृष्टिकोनाला पुढे नेण्यासाठी मी राष्ट्रपती मुइझ्झू आणि इतर मालदीवच्या नेत्यांसोबतच्या भेटींसाठी उत्सुक आहे. भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' धोरण आणि 'व्हिजन ओशन' अंतर्गत हिंद महासागर क्षेत्रातील शांतता, समृद्धी आणि स्थिरतेसाठी सहकार्य मजबूत करेल.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ना.पंकजाताई मुंडेंनी मंजूर केलेल्या परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी ७२ एकर शासकीय गायरान जमीन पशुसंवर्धन विभागाला प्रदान

महसूल व वन विभागाचा आदेश निर्गमित ; महाविद्यालय उभारणीचा मार्ग मोकळा

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.२३ जुलै**

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मंजूर करून आणलेल्या परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी परळी व लोणी येथील ७२ एकर शासकीय गायरान जमीन महसूल व वन विभागाने पशुसंवर्धन विभागाला प्रदान केली आहे.याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला.

या आदेशामुळे परळी वैजनाथ येथे नवे पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ मधील ८ हेक्टर ८० आर (२२ एकर) व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर (५० एकर) अशी एकूण ७२ एकर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात येणार आहे. या संदर्भातील शासन मान्यता महसूल व वन विभागाने हा प्रस्ताव मंजूर केला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्यासंबंधित नियमांनुसार ही जमीन पशुसंवर्धन विभागाला हस्तांतरित करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा भागातील पशुवैद्यकीय शिक्षण व संशोधनाला नवे बळ मिळेल आणि शेतकरी व पशुपालकांना आधुनिक सेवा देण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होणार आहे.

परळीचा लौकिक वाढेल - ना. पंकजाताई मुंडे

परळीत होणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून मराठवाड्यात एक मोठे शैक्षणिक केंद्र उभारले जाणार आहे. पंकजाताई मुंडे यांनी मंत्री होताच पुढाकार घेऊन पाठपुरावा करत शासन दरबारी हा प्रकल्प मंजूर करून घेतलेला आहे.स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नवे दालन उभे राहणार आहे. पशुसंवर्धन संशोधनासाठी स्वतंत्र प्रक्षेत्र निर्माण होईल. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच शेतकरी व पशुपालकांसाठी तांत्रिक व आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान,

महाविद्यालया करिता जागा उपलब्ध झाल्यामुळे आता या प्रक्रियेला गती मिळणार आहे. आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाची जोड असलेले हे महाविद्यालय परळी तालुक्याचे लौकिक वाढवेल. सोबतच राज्याच्या पशूवैद्यकीय क्षेत्राला देखील यामुळे नवी उभारी मिळेल असं सांगत ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## अल्पवयीन पीडितेची सुटका, आरोपीला घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जुलै**

पोस्टे शिवाजीनगर गुन्हा रजिस्टर नंबर ६६/२०२५ कलम १३७(२), १४३(२) BNS हा दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दाखल झाला होता. सदर गुन्हा हा ०२/०७/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग झाला. सदर गुन्ह्याच्या मूळ फाईलचे, तपास अधिकारी झडख पल्लवी जाधव यांनी बारकाईने अवलोकन केले. त्यानंतर पीडित मुलीच्या आईची व भावाची त्यांच्या राहत्या घरी जावून भेट घेतली व त्यांच्याकडून गुन्ह्या संबंधाने माहिती मिळवली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. त्यावरून दिनांक १९/०७/२०२५ रोजी सकाळी AHTU ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने पुणे साठी रवाना झाली. पुणे शहरात लक्ष्मीनगर , वाल्हेकरवाडी येथील एका अपार्टमेंट च्या फ्लॅट मधे चिंचवड पोलीस ठाणेच्या हद्दीत पीडित मुलगी ही आरोपीच्या ताब्यात मिळून आली. सदर पीडीतेला व आरोपीला ताब्यात घेवून AHTU ची टीम बीडला आली व त्यांना पुढील तपासकामी पोस्टे शिवाजीनगर येथे हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली PSI पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात रक्तदान शिबिर

## सातशे रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जुलै**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पशुसंवर्धन तथा हवामान बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व जिल्ह्यातील जवळपास सर्व मंडळात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरस जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून जिल्हाभरात ७०० रक्तदात्यांनी रक्दान केले बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात लोकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले आहे .

राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचा दि.२२ जुलै रोजी वाढदिवस आहे तो संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला जात असून लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या दिनांक २६ जुलै रोजी वाढदिवस आहे या दोन्ही नेत्यांचा वाढदिवस राज्यभर उत्साहात साजरा केला जात असून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीने देखील विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात व उत्साहात वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले आहे. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचा जिल्हा कार्यालयात संपन्न झालेल्या रक्तदान शिबिराचे



उद्घाटन वाजता भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख जिल्हा सरचिटणीस ॲड.शिवाजीराव तांबे, प्रा.देविदास नागरगोजे, नवनाथ शिराळे, अशोक लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या या दोन्ही नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये जिल्हा भरातील १६ मंडलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान केले आहे.

# जवळबन येथे ग्रामविकास समितीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२३ जुलै**

तालुक्यातील जवळबन येथील ग्रामविकास समिती संस्थेतर्फे गावातील ६६ गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपयोगी साहित्य देऊन गुणगौरव करण्यात आला. गावातील ज्या विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनियर तसेच शासकीय सेवांमध्ये नियुक्ती झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. गावातील काही विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत आहेत. त्यापैकी इटली येथे पीएच डी प्राप्त डॉ.सुधीर भाकरे तसेच फिजिओथेरपी पदवी प्राप्त डॉक्टर कुलकर्णी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच पती प्रमोद करपे, प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,प्रा.बळवंते ,जगदीश करपे संस्थेचे कार्यवाह श्री कुलकर्णी उपस्थित होते जि प शाळेचे मुख्याध्यापक,माऊली विद्यालयाचे मुख्याध्यापक, सेवा सोसायटीचे चेअरमन नितीन भाकरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते मुलांकडून अवाजवी गुणवत्तेची अपेक्षा न ठेवता मुलांना त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेऊ द्यावे असे मत कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हनुमंत भोसले यांनी व्यक्त केले विद्यार्थी मार्कवंत होण्यापेक्षा गुणवंत व्हावा असे मत प्रा. बळवंते यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. मुलांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होण्यासाठी तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी गेल्या १८ वर्षापासून संस्थेतर्फे गुणवंताचा सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रास्ताविकातून प्रताप भाकरे यांनी संस्थेच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा इतिहास सांगितला. दोन्ही शाळेतील शैक्षणिक कामकाजाबाबत ग्रामस्थांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ.तानाजी जाधव यांनी केले.कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सौ.मंदाकिनी कुलकर्णी यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जुलै**

बीड शहरातील रहिवासी सौ. मंदाकिनी गंगाधरराव कुलकर्णी (केसापूरी परभणीकर) यांचे मंगळवारी दुपारी निधन झाले. त्या ६५ वर्षांच्या होत्या. मागील काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. बीड येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सेवाश्रम प्रकल्पाच्या संचालिका, सामाजिक कार्यकर्त्या मयूरी राजहंस यांच्या त्या आई होत.

# संत नामदेवनगरमध्ये तुकाराम माऊली येहळेगाव यांच्या पोथीचे वाचन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जुलै**

संत नामदेव नगरमध्ये रुक्मिणीकांत सांप्रदायिक वारकरी मंडळाचे सदस्य आर.डी.देशमुख यांच्या निवासस्थानी आषाढी कामिका एकादशीला (दि.२१ जुलै २०२५ रोजी सोमवारी) तुकाराम माऊली येहळेगाव यांच्या नऊ अध्यायी पोथीचे सामुदायिक वाचन करण्यात आले. यावेळी प्रभाकरराव कुलकर्णी, श्रीहरीभाऊ बुगदे आणि सौ.कुंदा बुगदे, सौ.अंजली रत्नपारखी, सौ.नलिनी एकबोटे, सौ.कुंदा कुलकर्णी, श्रीमती लीलाताई मानुरकर मामी, श्री आणि सौ.धसे, श्री आणि सौ.भुजबळ, श्रीमती कुलकर्णी सिस्टर, सौ.लतिका जोशी, सौ.जोजारे, सौ.राधा सुर्डीकर, सौ.देशमुख, सौ.खटावकर, सौ.दया साबळे, जगदीशराव देशमुख उपस्थित होते. सौ.शारदाताई देशमुख आणि श्री.आर.डी.देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले. संत नामदेवनगर येथील रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ निरनिराळे उपक्रम घेत असते. तुकाई पोथीचे नऊ अध्याय वाचन उपक्रम सुरू झाल्याबद्दल सर्वांना अतिशय आनंद झाला. बाळासाहेब पारगावकर यांच्या मार्गदर्शनानुसार दर महिन्यात एकादशीस हा कार्यक्रम घेतला जाणार आहे असे प्रसिद्धी विभागप्रमुख प्रा.डी.एस.कुलकर्णी यांनी सांगितले.

# माजलगाव शहर भाजपाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ जुलै**

भारतीय जनता पार्टी माजलगाव शहर मंडळच्यावतीने महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नामदार पंकजा मुंडे यांना उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभो व त्यांच्या हातून असेच जनसेवा घडत राहो अशी विघ्नहर्ता बुद्धी दाता गणपतीची पूजा व प्रार्थना करून करून या रक्तदान शिबिराचे अध्यक्ष डॉ. शंकर जुजगर प्रमुख पाहुणे डॉक्टर मधुकर घुबडे विष्णू मुंदडा यांनी श्रीफळ वाढवून फित कट करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजनही करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचां सत्कार केला. या रक्तदान शिबिराचे प्रास्ताविक



भारतीय जनता पार्टीचे मंडळ शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले या प्रस्तावितपर मनोगत व्यक्त करताना रत्नपाररखी म्हणाले कुठलेही बॅनरबाजी न करता आज रक्तदान शिबिर आयोजित केले व दि.२६ जुलै रोजी महात्मा फुले शाळेत शालेय साहित्य वाटप, गो शाळेत जाऊन त्या ठिकाणी गोमातेची सेवा करून गाईला लंपी लस दिली जाणार असून , वृक्षारोपण, पालावरील गरजू कुटुंबाला किराणा वाटप , हनुमान मंदिर व माजलगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये पूजा व महारती करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नामदार पंकजा मुंडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक व धार्मिक पद्धतीने संपन्न होणार आहे. शिबिराचे अध्यक्ष डॉ. जूजगर म्हणाले वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरासह विविध सामाजिक धार्मिक उपक्रम घेत आहात त्याबद्दल अभिनंदन करून शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांचे कौतुक केले. यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी पूर्ण वेळ थांबून त्यांचे अभिनंदन केले. व त्यांनी रक्तदान केल्याबद्दल भाजपा प्रदेश कार्यालयातून आलेले प्रमाणपत्र दिले. या रक्तदान शिबिरास भारतीय जनता पार्टीचे अरुण राऊत डॉ.प्रशांत पाटील अशोक तिडके अभय होके जगदीश चांडक सत्यनारायण उनवणे माऊली सरवदे ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे बाळासाहेब क्षीरसागर आनंद कुलकर्णी उमेश जाधव रामेश्वर चव्हाण सुभाष कांबळे संतोष जाधव विनोद लड्डा गौरी देशमुख पूजा मुंडकर चित्रा पाठक अनिता अलकुंटे, भरत जोशी, दत्ता क्षिरसागर,मनोज कोरडे नामदेव मुळे राम शिंदे दत्ता महाजन यासह नेतेगन पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमाची सूत्रसंचलन कैलास खुरपे यांनी केले व आभार प्रदर्शन पवन मोगरेकर यांनी केले.

# विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ जुलै**

शासकिय सेवेत कर्तव्यदक्ष राहून सामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांच्या न्याय हक्काचे निर्णय घेणाऱ्या , गैरप्रकार करणाऱ्यांवर तालुका दंडाधिकारी म्हणून कठोर भूमिका घेऊन कायद्याने कारवाई करणाऱ्या , शासकिय सेवेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या कार्याची दखल घेत ' नवभारत/नवराष्ट्र ' तर्फे मराठवाडा आयकॉन म्हणून सन्मान करण्यात आला.

हा सन्मान सोहळा कार्यक्रम संभाजी नगर येथे हॉटेल रामा इंटर नॅशनल येथे रविवार २० जुलै रोजी पार पडला . यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे , जालन्याचे खासदार डॉ कल्याण काळे , विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते तहसिलदार चंद्रकांत शेळके यांना मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी नवभारत समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए. श्रीनिवास , सरव्यवस्थापक कल्याण पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे शिक्षण बी.ए. , डी.एड. झालेले असून त्यांचे मुळ गाव जळगाव जिल्ह्यात आहे.

त्यांना विविध विषयांवर लेखनाची आवड असून त्यांचे प्रासंगिक लेख विविध वर्तमानपत्रांमधून प्रकाशित झालेले आहेत . वैयक्तिक जीवनात सामाजिक , प्रर्यावरण , साहित्य क्षेत्रात त्यांचा सक्रीय सहभाग असतो . ते ४ ऑगस्ट २००४ रोजी शासकिय सेवेत दाखल झाले . सद्य स्थितीपर्यंत गेवराई , गंगापूर , घनसांगवी , पैठण , अंबड या ठिकाणी तहसीलदार म्हणून सेवा बजावली असून सध्या बीड येथे तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत , असे यावेळी कार्यक्रमात सांगण्यात आले . तहसीलदार शेळके हे बीडला रुजू झाल्यापासून त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या कामांचा धडाका लावला आहे . विशेषतः शिव पानंद रस्ते खुले करून देण्यासाठी ते स्वतः जातीने हजर राहून रस्ते खुले करून देत आहेत . कार्यालयात येणाऱ्या लोकांशी सौजन्याने वागून प्रत्येकाचे प्रश्न समजून घेत आहेत . त्यामुळे बीडच्या जनतेला ते आपलेसे वाटायला लागलेले आहेत . २०१२ ते २०१५ या कालावधीत गेवराईला तहसीलदार असताना तहसीलदार शेळके यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न लावले होते . सुमारे शंभर किलोमीटर रस्ते त्यांच्या कालावधीत झाले होते . त्यामुळे गेवराईचे नागरिक अजूनही त्यांची आठवण काढतात . त्यावेळी जिल्हाधिकारी म्हणून सुनील केंद्रेकर कार्यरत होते . केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक लोकहिताचे उपक्रम राबविले होते . २०१४ साली दुष्काळाच्या कालावधीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बीडच्या वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेऊन विशेष बातम्या ही छापल्या होत्या . संभाजीनगरमधील गंगापूर व पैठण येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना विविध निवडणुका शांततापूर्ण पद्धतीने घेणे , संजय गांधी श्रावण बाळ योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे , रस्ते काढून देणे यासाठी स्थानिक शेतकरी आजही त्यांचे नाव घेतात . २०२३ साली अंबड येथे कार्यरत असताना मनोज जरांगे यांचे उपोषण , यावेळी झालेला लाठी हल्ला आणि एकंदरीतच कायदा व व्यवस्था याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला होता . वरिष्ठांच्या मदतीने ही परिस्थिती कुशलरीत्या हाताळल्यामुळे तहसीलदार शेळके यांचा अनुभव अधिकच दुणावला.विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आपल्या मनोगतात असे सांगितले की , मराठवाडा आयकॉन मिळाल्याने आपली समूहाचे कौतुक करताना सांगितले की , नवभारत / नवराष्ट्रने सुरू केलेला हा उपक्रम समाजासाठी अत्यंत चांगला आहे . समाजातील प्रेरणा देणाऱ्या लोकांना पुढे आणणे ही काळाची गरज आहे . तसेच सरकार कुठे चुकते याबाबत परखड भूमिका घेणेही आवश्यक आहे , कारण अशा मतांमुळे समाजाला योग्य दिशा मिळते. नवभारत समूहाचे याबद्दल




जबाबदारी अधिक वाढते . 'आयकॉन' या शब्दाचा अर्थ मी कोण ? असा होतो , त्यामुळे आपण स्वतःची ओळख जाणून समाजासाठी सातत्याने कार्यरत राहणे आवश्यक आहे . हा पुरस्कार केवळ सन्मान नसून इतरांना आणि स्वतःलाही प्रेरणा देणारा आहे. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी ' मराठवाड्याचे ' मुख्य आकर्षण 'मराठवाडा आयकॉन पुरस्कार वितरण समारंभ ', हे ठरले आहे , असे नमूद केले . या सोहळ्यात मराठवाड्यातील विविध भागात आणि विविध क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि संस्थांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले . या कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे समाजात जागृती निर्माण होत आहे आणि सकारात्मक बदल घडत आहेत , असे नमूद केले . त्यांनी नवभारत मनःपूर्वक कौतुक आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की , नवभारत समूहाचा हा स्तुत्य उपक्रम आहे . समाजात ज्या लोकांनी उल्लेखनीय कार्य केले आहे , त्यांचे कार्य माध्यमांनी पुढे आणणे गरजेचे आहे. बीड तालुक्यातील मसेवाडी मुळकवाडी येथील वादग्रस्त रस्ता , ढेकणमोह येथील वादग्रस्त शिवरस्ता असो की यासारखे अनेक रस्त्यांचे प्रश्न असो , तहसीलदार शेळके यांनी चुटकीसरशी मार्गी लावले . असे तहसीलदार मिळाले तर तालुक्यातील प्रश्न शिल्लकच राहणार नाही अशी बीडच्या सर्वसामान्य जनतेची भावना या निमित्ताने प्रकर्षाने जाणवली . अशा शासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करणे उचितच आहे . यानिमित्ताने त्यांच्या पुढील कार्यास , पुढील वाटचालीस शुभेच्छा!

# मॉडेल इंग्लिश स्कुलमध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ जुलै**




येथील मॉडेल इंग्लिश स्कुलमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक बी. एम. जरे होते.प्रमुख पाहुणे म्हणून सुलभा पोटेकर मॅडम, आणि उजगरे सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभिक लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बोलताना सुलभा पाटेकर यांनी लोकमान्य टिळकांच्या कार्याविषयी माहिती सांगुन त्यांच्या स्वातंत्र्य लढयातील योगदानाविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक बी. एम. जरे यांनी केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतीक विभाग प्रमुख सचिन फंदे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमांचे सुत्रसंचालन शेख शेजिया व शेख मारिया या विद्यार्थिनींनी केले तर आभार उबेद सर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी ,विद्यार्थिनी, शिक्षकांची उपस्थिती होती.

## पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कॅन्सर रोगनिदान शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा : उमाताई समशेट्टे



परळी वैजनाथ–२३ जुलै – ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी शहरात सामाजिक सेवा उपक्रमात कॅन्सर रोगनिदान शिबीर होत आहे. या शिबिराचा गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा परळी शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी केले आहे. पर्यावरण वातावरण बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रविवार, दि २७ जुलै रोजी कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास संभाजीनगर चे तज्ञ डॉक्टर शैलेश अग्रवाल तोंड व घसा कर्करोग तपासणी करून निदान करणार आहेत. डॉ शैलेश अग्रवाल हे मराठवाड्यातील तज्ञ डॉक्टर आहेत. हजारों कर्करोगग्रस्त रुग्णांवर त्यांनी उपचार केले आहेत. डॉ शैलेश अग्रवाल यांच्या बरोबरच या शिबिरास रेडिएशन कर्करोग तज्ञ डॉ. उत्पल गायकवाड व मेडिकल ऑनकोलॉजिस्ट डॉ केतन शिरसाट तपासणी करणार आहेत. वेदांत होमिओ क्लिनिक, नाथ रोड, औद्योगिक वसाहत येथे रविवार, २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११नेते ३ वाजेपर्यंत कॅन्सर रोगनिदान शिबीर होत आहे. तोंड आणि जिभेवर दीर्घकाळ टिकणारे फोड, डाग, आवाज बदल, थायरॉईड नोड्युल, अन्न गिळण्यात अडचण व वेदना, तंबाखू गुटख्यामुळे तोंड कमी उघडणे, तोंडातून रक्त येणे तसेच भरून न येणारी जखम, अचानक कमी होणारे वजन, शरीरावर आलेली गाठ, सततचा ताप, थकवा, भूक न लागणे असे लक्षणे असणाऱ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा शहराध्यक्षा उमाकाकू समशेट्टे यांनी केले आहे.

## अंधानेर प्रशालेच्या अध्यक्षपदी विलास आहेर; उपाध्यक्षपदी कनिजा शेख यांची सर्वानुमते निवड

कन्नड दि.२२ जुलै – तालुक्यातील अंधानेर येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विलासराव आहेर तर उपाध्यक्षपदी कनिजा शेख यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. दि.२२ मंगळवार रोजी प्रशालेत पार पडलेल्या समितीच्या बैठकीत ही निवड खेळीमेळीच्या वातावरणात शांततेत पार पडली. यावेळी सरपंच अशोक दाबके, मुख्याध्यापक राजीव जाधव, ग्रामविस्तार अधिकारी माणिकराव पगारे, मावळते अध्यक्ष गोरख करवंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रस्ताविक संजय केवट यांनी केले. शालेय व्यवस्थापन समिती ही शाळा, पालक, ग्रामपंचायत व शिक्षण विभाग यांच्यातील दुवा म्हणून काम करते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, शिस्त आणि विविध उपक्रमांचे आयोजन या बाबींमध्ये समिती सक्रिय सहभाग घेते. ही समिती शाळेच्या निर्णय प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग असून, पालकांचा सहभाग निश्चित करणारी एक प्रभावी यंत्रणा आहे.

या समितीत सदस्य म्हणून बाळू सोनवणे, अझहर बागवान, वैशाली लोखंडे, उषा सोनवणे, अशोक सोनवणे, सोनाली सातदिवे, मिलिंद गायकवाड, फिरोज पठाण, दत्तू गायकवाड, कल्पना बावस्कर, सरला नेवगे यांचा समावेश आहे. सर्व नवनियुक्त सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन संजय केवट यांनी केले तर आभार राम गुढेकर यांनी मानले.

## टाटा मोटर्सकडून एस प्रो लाँच

पुणे : टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लाँचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. ३.९९ लाख रूपयांच्या सूरवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो.उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते.

## भारताचे पहिले कफ क्लिनिक्स

मुंबई : महसुलाच्या निकषावर जगातील सर्वात मोठी, ग्राहक आरोग्य क्षेत्रात काम करणारी प्युअर-प्ले कंपनी तसेच कफ श्रेणीमधील विख्यात ब्रॅण्ड बेनाड्रिल ची निर्माती केनव्ह्यू असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया (एपीआय)च्या सहकार्याने 'कफ क्लिनिक्स' हा उद्योगातील पहिलावहिला उपक्रम सुरू केला आहे. या वैज्ञानिक उपक्रमाचा एक भाग म्हणून भारतभरात १० कफ सेंटर्स स्थापन करण्याची केनव्ह्यूची योजना आहे. या केंद्रांद्वारे आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी कफाची तपासणी व तत्सम मूल्यमापनांसंदर्भातील सर्वोत्तम वैज्ञानिक पद्धतींविषयीच्या ज्ञानाची व्याप्ती वाढावी तसेच या पद्धतींचा अधिक व्यापक स्तरावर वापर व्हावा या उद्देशाने 'कफ क्लिनिक्स' चालविली जातील.

## हिमालया बेबीकेअरची ५०० हून अधिक स्तनपान कक्षांची भर

२३ जुलै २०२५: आई आणि बाळासाठी निरोगी सुरुवात सुनिश्चित करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा भाग म्हणून, हिमालया बेबीकेअरने भारतभर ५०० हून अधिक स्तनपान कक्ष यशस्वीरित्या उभारल्याची घोषणा अभिमानाने केली आहे. हे कक्ष मातांसाठी स्वच्छ, खाजगी आणि आरामदायक वातावरणात बाळाला दूध पाजण्याची सुविधा देतात. ही महत्वपूर्ण उपलब्धी म्हणजे मातांसाठी स्वच्छ आणि विचारपूर्वक तयार करण्यात आलेल्या सुविधा देण्याच्या हिमालया ब्रँडच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे विशेषतः अशा वेळी जेव्हा मातांच्या आरोग्यविषयी जागरूकता वाढवणे खूप गरजेचे आहे. ही स्तनपान कक्षे सध्या भारतातील २७ विमानतळांवर उपलब्ध आहेत, ज्यामध्ये बेंगळुरू, हैदराबाद, कोलकाता आणि गोवा यांसारखी महत्त्वाची प्रवास केंद्रे समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातही मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती, नांदेड आणि शिर्डी या प्रमुख विमानतळांवर हे खास कक्ष तयार करण्यात आले आहेत.

## रेड लेबल नॅचरल केअर सादर करत आहेत 'इम्युनिटी की चुस्की'

मुंबई: यंदाच्या मान्सून मोसमात रेड लेबल नॅचरल केअर संपूर्ण भारताला आमंत्रित करत आहे एक क्षण काढून जरासं थांबण्यासाठी आणि काहीतरी गरमागरम, नॉस्टेल्जिक आणि संगीतमय अनुभवण्यासाठी. 'इम्युनिटी की चुस्की' या आपल्या नव्या मेगा-कँपेनसह या ब्रँडने लहानपणीच्या रम्य आठवणी, वेलनेसचे फायदे आणि चहाची मजा या सगळ्याला एकत्र आणत एक अविस्मरणीय मान्सून सेलिब्रेशनचा अनुभव तयार केला आहे.या नव्या कँपेनचा मूळ गाभा आहे मराठीतील लोकप्रिय, उत्साही बालगीत 'ये रे ये रे पावसा'. अनेक पिढ्यांच्या पावसाळ्यातील आठवणींना या गाण्याची किनार आहे. रॅपर्स श्रेयस सागवेकर आणि कृणाल घोरपडे म्हणजेच तामडी चमडी या लोकप्रिय गाण्यासाठी ओळखले जाणारे क्रिएटेक्स यांनी या गाण्याला मान्सून अँथमचे नवे रूप दिले आहे. झी ची निर्मिती आणि रंजू वर्गीस यांचे दिग्दर्शन असलेल्या या गाण्याच्या नव्या जमान्यातील नव्या रुपात पावसात मनसोक्त भिजत नाचण्याचा आनंद प्रतित होतो. या कालातीत गाण्याच्या चालीला आधुनिक पद्धतीने मानवंदना देत यात हिप-हॉप बिट्स आणि भारतीय शास्त्रीय संगीताचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे.

## तान्हाजी नवगिरे यांचे निधन



सोयगाव,दि.२३ जुलै – शहरातील नारळीबाग येथील रहिवाशी तान्हाजी सुकदेव नवगिरे(वय.८३) यांचे वृद्धापकाळाने दि.२२ मंगळवार रोजी सकाळी १०:०० वाजता निधन झाले.त्यांचेवर सायंकाळी ६:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,सुन,नातवंडे असा परिवार आहे.ते संतोष नवगिरे यांचे वडील होत.

# ५० खाटांखालील रुग्णालयांना सूट द्यावी, मनपाचा कर मागे घ्यावा- 'आयएमए'ची मागणी

छत्रपती संभाजीनगर- इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मा. राज्यसभा खासदार व माजी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड सरांच्या कार्यालयात भेट दिली. यावेळी आरोग्यसेवेच्या संदर्भातील विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल व सकारात्मक चर्चा झाली. या वेळी डॉ. उज्वला दहिफळे, डॉ. योगेश लक्कास,डॉ. संभाजी चिंतले, डॉ. प्रशांत दरक, डॉ. प्रदीप बेजर्गे, डॉ. अर्चना भांडेकर,डॉ. सोनाली सावजी, ऋडॉ बाबासाहेब उनवणे ,आदी उपस्थित होते.



महानगरपालिकेने खाजगी रुग्णालये व क्लिनिक यांच्यावर ५००० नोंदणी व २५०० नूतनीकरण शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे.

IMA ने स्पष्टपणे सांगितले की सर्व वैद्यकीय संस्था आधीच Bombay Nursing Home Act अंतर्गत नोंदणीकृत असून, त्या दरवर्षी ५००० ते ३०,००० इतके शुल्क भरतात. त्यामुळे हे नवीन शुल्क म्हणजे दुहेरी कर असून पूर्णतः अन्यायकारक आहे.

डॉ. कराड सरांनी या शुल्काबाबत सकारात्मक भूमिका घेत स्पष्ट आश्वासन दिले की ते लवकरच महापालिकेला यासंदर्भात योग्य त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले.

डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात प्रभावी उपाय व कायदा: अनेक ठिकाणी डॉक्टरांवर होणारे हल्ले ही गंभीर बाब आहे. याविरोधात केंद्र सरकारने कठोर कायदा बनवावा व त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी केली.

या सर्व मागण्यांवर सखोल चर्चा केल्यानंतर माननीय डॉ. कराड यांनी आश्वासन दिले की, या सगळ्या मुद्द्यांबाबत मी स्वतः लक्ष घालीन. डॉक्टरांवरील हिंसाचार थांबावा व ५० खाटांखालील रुग्णालयांबाबत नियम शिथिल व्हावेत, यासाठी मी प्रयत्न करेन.

यासाठी IMA छत्रपती संभाजीनगर शाखा, IMA चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे डॉ. कराड सरांनी स्पष्ट सांगितले.

# कन्नड तालुक्याला रोहयोच्या कामाचे आले चार कोटी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२३ जुलै – तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर, गायगोठा, वृक्षलागवड, फळबाग या कामांच्या लाभार्थ्यांना डावलून सार्वजनिक कामे मातोश्री पाणंद रस्ते, सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक आदींच्या कामांचा अर्थात कंत्राटी कामांचा निधी दिला गेला आहे. याअगोदर दि १४ , व १७ जुलै ला निधी आला होता यानंतर दि २१ रोजी पुन्हा सुमारे चार कोटी रुपयांचा निधी आला मात्र तो सार्वजनिक कामांचा आला. वास्तविक पाहता शेतकऱ्यांनी व्याजाने उसनवारी करून गायगोठे , सिंचन विहिरीची कामे पूर्ण करून दोन ते तीन वर्षे झाली मात्र निधी मिळत नव्हता आता निधी आला तो फक्त रस्त्यांच्या कामांना यामुळे गरीब शेतकरी उपाशी व रस्त्यांचे कामे करणारे ठेकेदार तुपाशी अशी गत झालेली आहे . याबाबत पंचायत समिती मग्रारोहयो कक्षातील कोणीही माहिती देत नाही गटविकास अधिकारी ढोकने यांची आठ दिवसापूर्वी बदली झाली त्यांच्या जागी रामवत आले आहेत मात्र ते अद्यापही कन्नड येथे आले नाही.

ज्या शेतकऱ्यांचे दोन वर्षांपूर्वी पैशाची मागणी ऑनलाईन केलेली आहे अद्यापही त्यांचे पैसे आले नाही, तर ज्यांनी आर्थिक संबंध जोपासले त्यांचे पैसे आलेआहेत ? . कन्नड पंचायत समितीच्या मग्रारोहयो कक्षातील कर्मचाऱ्यांनी बहुतांश शेतकऱ्यांची पैशाची मागणी ऑनलाईन केलीच नाही, त्या कर्मचाऱ्यांनी फक्त रस्त्याच्या कामांना प्राधान्य दिले असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार या दुसऱ्या टप्प्यात आलेल्या निधीत वैयक्तिक कामाचे फक्त १८ शेतकऱ्यांना २४ लाख रुपयांचा निधी आलेला आहे .बाकी सर्व निधी सार्वजनिक कामांचा आलेला आहे.

# भारतीय जनता पार्टी बिडकीन मंडळ वतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न

बिडकीन दि २३ जुलै भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पक्षाचे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण त्यांच्या संपर्क कार्यालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, शासकीय रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर चिकलठाणा यांच्या सहकार्याने घेण्यात आले, या



शिबिराचे उद्घाटन बिडकीन मंडळ अध्यक्ष विजय चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले, या शिबिर मध्ये ४१ जणांनी रक्तदान केले आहे, यावेळी मंडळ अध्यक्ष विजय चव्हाण, गणेश काळे, चंद्रकांत हुड,अजय राठोड,ग्रामपंचायत सदस्य अविनाश राठोड,निकेश राऊत, सुनील गडदे, अर्जुन भवर, भागचंद कोथिंबिरे, भागवत ठाकूर, अभिजीत ढाकेफळे, दिनेश तोतला, निलेश धडे,अजय राठोड, किशोर धर्मे,शुभम औटी, संतोष एरंडे, भाऊसाहेब भवर, दिपक पातुनकर, साईनाथ गायके, सुधीर लंबाडे, आदींनी रक्तदान केले यांना बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

# प्रवरा सहकारी बँकेच्या वेळेत घाट शाखेचा शुभारंभ

अहील्यानगर दि.२३ प्रतिनिधी



सहकारी बँकींग क्षेत्रात प्रवरा सहकारी बँकेने प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे. विळदघाट येथे नव्याने सुरू झालेली बँकेची शाखा अहील्यानगरच्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्राच्या यशस्वी वाटचालीत महत्वपूर्ण भागीदारी करेल असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

प्रवरा सहकारी बँकेने विळदघाट येथे सुरू केलेल्या बँकेच्या कार्यालयाचे उद्घाटन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सौ.शालीनी विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.या कार्यक्रमास माजी आमदार नंदकुमार झावरे, वसंतराव कापरे, बँकेचे चेअरमन डॉ भास्करराव खर्डे, व्हा.चेअरमन मच्छीद्र थेटे, सीईओ सौरभ बालोटे सर्व संचालकांसह पद्मश्रीं डॉ विखे पाटील फाउंडेशनचे डायरेक्टर डॉ अभिजीत दिवटे, डॉ पांडूरंग पवार यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील यांनी अतिशय दूरदृष्टीने या बॅकेची मुहूर्तमेढ रोवली.समाजातील छोट्या वर्गाला या बॅकेने विविध कर्ज योजनेतून आधार दिला.आज सभासद ठेवीदार आणि चांगल्या कर्जदारांच्या सहकार्याने पन्नास वर्षांची यशस्वी वाटचाल बॅकेने पूर्ण केली असून सुमारे चौदाशे कोटी रुपयांचा व्यावसायिक टप्पा पूर्ण केला असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

विळदघाट येथे बॅकेची सुरू होणारी बॅकेची शाखा अहील्यानगर जिल्ह्यातील व्यापारी उद्योजक आणि छोट्या व्यवसायिकांच्या करीता आधार ठरेल. अहील्यानगरच्या व्यापरी आणि औद्योगिक क्षेत्राला मोठी परंपरा लाभली असल्याने भविष्यात या शहराच्या या प्रगतीत प्रवरा बॅके नक्कीच चांगली भागीदारी करेल. नागापूर औद्योगिक वसाहतीला ही शाखा खूप जवळ असल्याने उद्योजकांना दैनंदीन अर्थिक व्यवहारासाठी विश्वासाचे ठिकाण निर्माण झाले असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

बॅकींग क्षेत्रात वाढती स्पर्धा पाहाता ग्राहकांच्या सुध्दा काही अपेक्षा जाणून घेण्यासाठी प्रवरा बॅंकेच्या वतीने ग्राहक तसेच उद्योजकांच्या संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे विखे पाटील म्हणाले. सर्वाचे स्वागत बॅकेचे चेअरमन डॉ भास्करराव खर्डे यांनी केले.

# एक रक्ताची बॅग वाचवू शकते तीन जणांचे प्राण : आ. बंब

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गंगापूर खुलताबाद मतदार संघातील तीन मंडळात विक्रमी रक्तदान

खुलताबाद – महाराष्ट्र राज्यात रक्ताचा तुटवाडा निर्माण झाला असून प्रत्येक दोन सेकंदाला रुग्णांना रक्ताची आवश्यकता भासत असल्याने रक्ताची मागणी वाढत आहे. आपण केलेल्या एक रक्ताच्या बॅगमधून निघत असलेल्या आरबीसी, प्लेटलेट आणि प्लाझ्मा या घटकातून किमान तीन जणांचा जीव वाचवता येऊ शकतो या जाणिवेने आम्ही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त राज्यात जिल्ह्यात आणि तालुक्यात महारक्तदान या एकदिवसीय शिबिराचे आयोजन करून रक्ताची काही अंशी तूट भरून काढण्याचा संकल्प केला असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले.



**गंगापूर उत्तर मंडळ – ३०१**
**गंगापूर दक्षिन मंडळ – १८२**
**खुलताबाद मंडळ – १५३**
**खुलताबाद गंगापूर विधानसभेत मंडळात एकूण ६३६ इतके रक्तदान करण्यात आले.**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांच्या पुढाकाराने (दि.२२) गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यातील तीन मंडळात आठ ठिकाणी विविध रक्त संकलन करणाऱ्या रक्तपेढींच्या माध्यमातून तब्बल ६३६ रक्तदात्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले.

खुलताबाद तालुक्यातील तीन मंडळातील बाजारसावंगी, खुलताबाद व गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन, गंगापूर, शेंदूरवादा, तुर्काबाद, वाळूज, शेनपुंजी रांजणगाव या आठ ठिकाणी मोठया उत्साहाने रक्तदान करण्यात आले.

महिलांची रक्तदानासाठीची संख्या नगण्य असल्याने यावेळी मनीषा बंब यांनी उपस्थित महिलांना रक्तदानाचे महत्त्व सांगून आमदार बंब यांची कन्या इंदिरा बंब व पत्नी मनीषा बंब यांनी गंगापूर तालुक्यातील वाळूज आणि शेनपुंजी रांजणगाव येथे रक्तदान करून या रक्तदान अभियानात सक्रिय सहभाग नोंदवत इतर महिलांना रक्तदान करण्याचे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान आमदार बंब यांनी सकाळपासूनच सर्वच रक्तदान करण्यात येणाऱ्या स्थळांना वैयक्तिक भेटीदेऊन त्या – त्या स्थळांवरील रक्तदात्यांना प्रोत्साहित करून उत्स्फूर्तपणे रक्तदान करून घेत त्यांचे आभार मानले. या शिबिरासाठी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे गंगापूर उत्तर तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, गंगापूर दक्षिण तालुकाध्यक्ष सुरेश शिंदे खुलताबाद तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण जि प माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड, माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे शहराध्यक्ष परसराम बारगळ सतीश दांडेकर संतोष गायकवाड अरुण आघाडे संदीप निकम यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. २६५/२०२५ पुढील तारीख २६/०८/२००५

अर्जदार : १. कंसरवाई फकीरराव जाधव, वयः ८५ वर्ष, धंदाः घरकाम, रा. पळशी बु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. वत्सलाबाई जयवंता गोराडे, वय. ७० वर्ष, धंदा. घरकाम, रा. मोहरा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते २ हे मयत फकीरराव सांडू जाधव यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ व २ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र. १ ही फकीरराव सांडू जाधव यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ मुलगी आहे. नामे मयत फकीरराव सांडू जाधव यांना अर्जदार क्र. १ व २ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत फकीरराव सांडू जाधव अर्जदार क्र.१ व २ यांचे पति व वडील हे दि. ०२/०४/२००५ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा पळशी बु, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत फकीरराव सांडू जाधव यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभघेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः २३/७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ट लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणि न्यायधिश के. स्तर, कन्नड

---

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सिल्लोड यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४७३/२०२५

१/– कांताबाई हरिदास दांडगे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. खूपटा, ता. सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/– गंगाधर हरिदास दांडगे, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/– प्रियांका भागवत कोरड, वय २२ वर्ष, धंदा घरकाम, रा. हिसोडा, ता. भोकरदन, जिल्हा जालना. ४/– अश्विनी हरिदास दांडगे, वय २० वर्ष, धंदा शिक्षण रा. खूपटा, ता. सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. ५/– संजीवनी हरिदास दांडगे, वय १७ वर्ष, अ.पा. क. म्हणून अर्जदार क्र. १. ६/– रवींद्र हरिदास दांडगे, वय १४ वर्ष, अ.पा. क. म्हणून अर्जदार क्र. १.

विरूद्ध

महराष्ट शासन मार्फत, जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनील गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत हरिदास श्रीपत दांडगे यांचा दि. २०.०२.२०२५ रोजी मौजे खुपटा, ता. सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत हरिदास श्रीपत दांडगे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. १८/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ११/०९/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सिल्लोड)

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर. एस. तापडीया मॅडम, दुसरे सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३६९/२०२५

अर्जदार : चंद्रकला भ्र. एकनाथ गायकवाड, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, रा. गायकवाड वस्ती, अंधानेर फाटा, अंधानेर, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर

– विरुध्द –

गैरअर्जदार : १– मिना भ्र. मधुकर गायकवाड, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. देवणाळा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २– कुसूम भ्र. लालचंद मोरे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. भावना इलेक्ट्रीक्स दुकान, नंदनवन कॉलनी, छ. संभाजीनगर, ता. व जिल्हा छ. संभाजीनगर ३–राजेश पिता एकनाथ गायकवाड, वय ५६ वर्षे, धंदा नौकरी, रा. धर्मदाय आयुक्त कार्यालय, पुणे तालुका व जिल्हा पुणे. ४– बबीता भ्र. सुरेश बहिरव, वय ५४ वर्षे, व्दारा प्राध्यापक सुरेश बहिरव, रा. उमरगा, ता. उमरगा, जिल्हा धाराशिव

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत...

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. अनंत के. शेजवळ, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ही मयत एकनाथ पिता तान्हुजी गायकवाड यांची पहीली पत्नी आहे. गैरअर्जदार क्रमांक १ ते ४ हे अर्जदाराच्या सावत्र मुली व मुलगा आहे. अर्जदार क्रमांक १ ही मौजे अंधानेर गायकवाड वस्ती अंधानेर फाटा ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे राहत असून गैरअर्जदार क्रमांक १,२ व ४ यांचे लग्न झाले असून त्या त्यांच्या सासरी वेगवेळ्या ठिकाणी राहत आहे. तसेच गैरअर्जदार क्रमांक ३ हा धर्मदाय आयुक्त कार्यालय, पुणे येथे नौकरीस असल्या कारणाने तो तेथे राहत आहे. अर्जदार क्रमांक १ हिने मयताचे वारस प्रमाण पत्र मिळावे म्हणून मे. न्यायालयात प्रस्तुत प्रकरण दाखल केले आहे. मयत एकनाथ पिता कान्हुजी गायकवाड हे पोलिस खात्यात सहाय्यक फौजदार म्हणून कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन येथे नौकरीस होते, व ते तेथुनच सेवा निवृत्त झाले होते, त्यांचा सध्याचा व कायमस्वरुपीचा पत्ता गायकवाड वस्ती अंधानेर फाटा, अंधानेर ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर हाच होता व आहे. मयत हे वृध्दापकाळामुळे आजारी असल्यामुळे त्यांना वैदयकीय महाविदयालय छ. संभाजीनगर येथे दाखल केले होते, त्यात त्यांना निमोनीया झाल्यामुळे त्यांचा दिनांक ७.६.२०२५ रोजी मृत्यु झाला, त्यांचा मृत्युचा दाखला अवलोकनार्थ सोबत दाखल करीत आहे. मयत एकनाथ कान्हुजी गायकवाड यांना अर्जदार चंद्रकला भ्र. एकनाथ गायकवाड– पत्नी आहे. सत्यभामा भ्र. एकनाथ गायकवाड दुसरी पत्नी होती ती दिनांक १४.१०.२०१२ साली मृत्यु पावली आहे, म्हणजेच एकनाथ गायकवाड हयांच्या हयातीत मृत्यु पावली आहे, तिच्या जलदान विधीची कार्यक्रम पत्रीका सोबत जोडली आहे. गैरअर्जदार क्रमांक १ ते ४ हया सत्यभामाबाईचे मुली व मुलगा आहे. गैरअर्जदार क्रमांक १ ते ४ हे वेगवेगळया ठिकाणी राहत असल्याने ते अर्जदार म्हणून सही करण्यास उपलब्ध नसल्यामुळे त्यांना नाममात्र चे गैरअर्जदार केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय व निमशासकीय फायदे तसेच सेवा निवृत्ती वेतन व मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद होण्यासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी सदरील अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जा सोबत मयताचा मृत्युचा दाखला, वैदयकीय महाविदयालय छ. संभाजीनगर यांचा व अर्जदाराचे आधार कार्ड मे. कोर्टाच्या अवलोकनार्थ दाखल करीत आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

साक : २१/०७/२०२५

आदेशावरून

लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# न्यायाची पुढची लढाई तरी नीट लढा!

गेल्या असंख्य पिढ्यांपासून महाराष्ट्रातील आणि देशातीलही लाखो कुटुंबांच्या घरात गुरुपौर्णिमेचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सुमारे १९ वर्षांपूर्वी ११ जुलै २००६ या दिवशीही हा सोहळा अनेक घरांत भाविकतेने साजरा होत होता, उत्सवाचा आनंद घराघरांत ओसंडत होता आणि अचानक त्या आनंदावर विरजण पडले. मुंबईची जीवनवाहिनी असे ज्याचे वर्णन केले जाते, त्या उपनगरी रेल्वेच्या गाडीत प्रचंड गर्दीच्या वेळी भीषण बॉम्बस्फोट घडले आणि १८७ निरपराध जीव काही क्षणांतच अनपेक्षितपणे भूतकाळात जमा झाले. तेव्हापासून पुढे दरवर्षी गुरुपौर्णिमेच्या दिवशी मुंबईतील अनेक घरांमधील आपल्या जिवलगाच्या उणिवांच्या जाणिवा जाग्या होतात. त्या घरांमध्ये गुरुपौर्णिमेचा सोहळा साजरा होत नाही, तर गमावलेल्या जिवाच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण करणारे श्राद्धविधी पार पडतात. अगदी १०-१२ दिवसांपूर्वी, १० जुलै रोजीच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशीही त्या घरांतील गमावलेल्या जिवाच्या आठवणीचा उमाळा येऊन दुःखाला वाचा फुटली. त्याच दिवसाच्या आठवणी ताज्या झालेल्या असताना सोमवारी न्यायालयाच्या एका निर्णयाने या दुःखाला नवा धक्का दिला. उपनगरी रेल्वेगाडीत भीषण बॉम्बस्फोट घडवून १८७ जणांच्या अनपेक्षित आणि अकाली मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या आरोपावरून गेली सुमारे १९ वर्षे तुरुंगात असलेल्या १२ आरोपींची मुंबईच्या उच्च न्यायालयाने तपास यंत्रणांच्या बेफिकीर ढिसाळपणावर बोट ठेवत सोमवारी निर्दोष मुक्तता केली. ११ जुलै २००६ रोजी सुरू झालेल्या एका न्यायालयीन लढाईतून निरपराधांच्या मृत्यूला न्याय देण्याच्या एका न्यायालयीन संघर्षाने अनपेक्षितपणे घेतलेल्या या वळणामुळे अनेकांना धक्का बसला आहे. तपास यंत्रणांच्या कुचकामीपणावर बोट ठेवून न्यायालयाने आरोपींच्या मुक्ततेचे आदेश दिल्याने, गुन्हेगारीच्या आरोपातून ते मुक्त झाले असले, तरी बॉम्बस्फोट घडविणाऱ्या गुन्हेगारांना त्यांच्या कृत्याची सजा होऊन मृतांना न्याय मिळवून देण्याची लढाई अजून संपलेली नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशास राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आता हा संघर्ष नव्या टप्प्यावर पुन्हा सुरू झाला आहे, त्यामुळे अंतिम न्याय मिळेपर्यंत तो संपू नये, ही त्या दुर्दैवी घटनेतील मृतांच्या सुहृदांची अपेक्षा नव्या उमेदीने जिवंत राहणार आहे.

दहशतवादाच्या कोणत्याही कृत्यास दयामाया नाही, प्रत्येक दहशतवादी कारवाईला तडाखेबंद जबाब दिला जाईल, असा मोदी सरकारचा निर्धार आहे. जेव्हा जेव्हा देशात दहशतवादी कारवायांनी डोके वर काढले, तेव्हा त्या विरोधातील शून्य सहनशीलता धोरणाचा अवलंब करून त्या कारवायांचा पुरेपूर बदला घेतला गेला. २००६ मध्ये घडविल्या गेलेल्या भीषण बॉम्बस्फोटात बळी पडलेल्यांच्या कुटुंबांनाही याच धोरणाची अपेक्षा होती. त्यामुळे त्या दहशतवादी कारवाईतील गुन्हेगारांना त्यांच्या कृत्याची ठोस सजा मिळेल व आपल्या गमावलेल्या जिवलगांना त्यांच्या पश्चात तरी न्याय मिळेल या अपेक्षेने ही कुटुंबे उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाची डोळ्यात प्राण आणून प्रतीक्षा करत होती. पण न्यायालये निष्पक्ष असतात. समोर असलेला घटनाक्रम, त्यास पुष्टी देणारे किंवा त्या घटनेशी संबंध नसल्याचे दावे करणारे पुरावे, साक्षीदार, कागदपत्रे किंवा आरोप सिद्ध करणारे वस्तुनिष्ठ आणि परिस्थितिजन्य पुरावे या सर्वांची सखोल छाननी करून हे सारे न्यायदेवता न्यायाच्या पारड्यात टाकले जाते आणि त्यानुसार निर्णय घेतला जातो. आता तर, न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टीदेखील काढली गेली आहे. सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या दालनांतील न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पूर्वी पट्टी बांधलेली असायची. एका हातात न्यायाचा तराजू आणि दुसऱ्या हातात तलवार घेतलेल्या न्यायदेवतेच्या प्रतीकात्मक मूर्तीच्या डोळ्यावरील ती पट्टी हटविली गेली आहे आणि हातातील तलवारीच्या जागी संविधानाची प्रत घेऊन न्यायदेवता उभी राहिली आहे. न्यायव्यवस्थेतील नव्या बदलानुसार, आता दंड संहितेची जागा न्यायसंहितेने घेतली आहे. कोणत्याही गुन्ह्यातील आरोपीस गुन्हेगार ठरवून शिक्षा देणे ही कायद्याची भूमिका नाही, तर गुन्हेगारीचा आरोप असलेल्यावर अन्याय होणार नाही, अशी नव्या न्यायसंहितेची इच्छा आहे. बॉम्बस्फोटाच्या त्या कृत्याच्या आरोपातून या आरोपींची मुक्तता झाली असली, तरी त्या दिवशी उपनगरी गाडीत झालेले बॉम्बस्फोट ही काही नैसर्गिक आपत्ती नव्हती. दहशतवादी कृत्य करून निरपराधांचे जीव घेण्याच्या उद्देशाने पुकारलेले एक छुपे युद्धच होते, हे स्पष्ट आहे. १९ वर्षे तुरुंगवासात असलेले व या कृत्याच्या आरोपावरून शिक्षा भोगणारे १२ जण आता निर्दोष म्हणून मोकळे फिरणार असले, तरी हा गुन्हा घडविला गेलेला आहे, ही बाब निर्विवाद आहे. विशेष न्यायालयाने या १२ जणांपैकी पाच जणांना फाशीची व सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. न्यायसंहितेनुसार, विशेष न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेवर उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब होणे जरुरीचे असते. त्यासाठी राज्य सरकारतर्फे उच्च न्यायालयात धाव घेतली गेली. आरोपींच्या वतीनेही या शिक्षेविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. गेल्या वर्षीच्या जुलैपासून सुरू असलेल्या या खटल्यासंदर्भात जवळपास ७५ सत्रांत सुनावणी झाली. सुमारे दीडशे साक्षी नोंदविण्यात आल्या. गुन्ह्याच्या आरोपांस पुष्टी देणारे पुरावे जवळपास १६९ खंडांमध्ये सादर करण्यात आले आणि विशेष न्यायालयाच्या सुमारे दोन हजार पानांच्या निकालपत्राचे पुनरावलोकन करण्यात आले. बॉम्ब बनविणे, रेल्वेगाडीत ठेवणे यासाठी विशेष प्रशिक्षण घेतल्याची कबुली आरोपींनी दिल्याचा तपास यंत्रणांच्या दाव्यावर उच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उमटविले आहे.

आरोपींकडून कबुलीजबाब घेण्यासाठी तपास यंत्रणांनी शारीरिक व मानसिक छळ केल्याचा बचाव पक्षाचा दावा न्यायालयाने मान्य केल्याने, तपास यंत्रणांना मोठी चपराक बसली आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आली असली, तरी त्याबाबत तातडीने काहीच वक्तव्य न करता, तीन महिन्यांनंतर मकोका लागू होताच आरोपींनी कबुली दिली, ही बाब संशयास्पद असल्याचा दावाही बचाव पक्षातर्फे करण्यात आला होता. साक्षीदारांच्या प्रामाणिकपणावरही उच्च न्यायालयाने शंका व्यक्त केली आहे. वापरलेली स्फोटके किंवा त्यांची वाहतूक करण्यात आल्याबाबतचा कोणताही ठोस पुरावा तपास यंत्रणा देऊ शकल्या नाहीत, असेही न्यायालयाने नोंदविले आहे. आरोपींचा स्फोटाच्या कारवाईशी थेट जोडणारी कोणतीही शस्त्रे किंवा साहित्य सापडले नसल्याने फिर्यादी पक्ष तपासात पूर्णपणे अपयशी ठरला असून फिर्यादी पक्षाकडून तयार करण्यात आलेले कथानकच संशयास्पद असल्याचे नमूद करत न्यायालयाने दिलेला हा निर्णय धक्कादायक असला, तरी या संदर्भातील न्यायालयाकडून असलेल्या अपेक्षेनुसारच आहे. त्यामुळे आता नव्याने सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागताना राज्य सरकारला उच्च न्यायालयाची ही निरीक्षणे गंभीरपणे ध्यानात घ्यावी लागतील. तपास यंत्रणांचा ढिसाळपणा ही अनेक प्रकरणांत न्यायालयासमोर उघडी पडणारी बाजू या प्रकरणातही समोर आली असून तपासातील गांभीर्याच्या अभावामुळे गुन्हेगार मोकळे सुटत असतील, तर अशा गुन्ह्यांमुळे ज्यांना फटका बसतो, त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. या प्रकरणात गुन्हा सिद्ध करता न आल्याने गुन्हेगारांना मुक्त करण्यात आले आहे. मात्र, रेल्वेगाडीत बॉम्बस्फोट घडवून अनेकांच्या मृत्यूस व अनेकांच्या शरीरावर व मनावर जन्मभराची जखम उमटविणारे हे कृत्य म्हणजे विघातक व दहशतवादी कारवाईच असल्याचे स्पष्ट असल्याने गुन्हा सिद्ध करून गुन्हेगारास शासन होईल एवढा सज्जड ऐवज न्यायव्यवस्थेसमोर मांडणे ही तपास यंत्रणांची जबाबदारी ठरते. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आरोपींना ठोठावलेली शिक्षा रद्द झाली असली, तरी केवळ पुरेशा पुराव्यांअभावी आणि तपासातील ढिसाळ कार्यपद्धतीमुळे न्यायालयाने न्यायाचा तराजू तोलला आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर नव्याने सुरू होणाऱ्या न्यायाच्या लढाईत या बाबी लक्षात घेतल्या जातील, ही अपेक्षा करावयास हरकत नाही.

## प्रासंगिक

# लोकमान्य टिळक आणि कर्मयोग

**डॉ. विलास चिंतामण देशपांडे**

आपल्याला ज्या आर्यजननीने जन्म दिला तिची ब्रिटिशांनी नागविलेली स्थिती ही लोकमान्यांच्या आंदोलनास प्रेरणादायक ठरली होती. त्यांच्या बालवयात गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या व्याख्यानांनी, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या स्वदेशाभिमानाने आणि स्वत:मधील प्रखर देशभक्तीच्या जाणिवेने त्यांना देशसेवेस आपली विद्वत्ता व आयुष्य खर्ची घालण्याची प्रेरणा मिळाली.

लोकमान्यांची स्मरणशक्ती प्रचंड व ज्ञान ग्रहण करण्याची वृत्ती दांडगी होती. म्हणूनच त्यांचे काट्यांनी भरलेले देशोद्धाराचे विश्वव्यापी प्रयत्न सुरू असताना त्यांनी इतिहास संशोधन, पंचांग संशोधन, वैद्यक संमेलन इत्यादी कार्य केले. त्यांची सर्वांत गोड कामगिरी ग्रंथ कर्तृत्व आणि सर्वांत भरीव व पोषक सर्वोपयोगी कामगिरी राजकीय चळवळ व लोकजागृती ही होय. ओरायन ऊर्फ अग्रहायणाचा विषय वेदाचा कालनिर्णय ठरविण्याचा होता. याच विषयावरून सुचलेला विषय जो आर्यांचे मूलस्थान, त्याचे विवरण त्यांनी आपल्या 'आर्यलोकांचे मूलस्थान' या ग्रंथात केले आहे. हे दोन्ही ग्रंथ त्यांच्या प्रगाढ संशोधन वृत्तीची साक्ष देतात. त्यांचा तिसरा व अत्यंत महत्त्वाचा व सर्वांना उपयोगी ग्रंथ म्हणजे भगवद्‌गीता रहस्य ऊर्फ कर्मयोगशास्त्र हा होय. त्याचा जरा तपशिलात जाऊन विचार करायला हवा.

'स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे' हे लोकमान्यांचे तत्त्व. त्याचा उच्चार करण्यास सुरुवातीस प्रतिबंध होता. त्यामुळेच 'स्वराज्याचे' स्थान त्यांच्या हृदयात खोल घट्ट जम बसवून होते. ते मिळविण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. परंतु स्वराज्य हे काही नुसत्या जपाने मिळत नाही. सर्व हिंदुस्थानच्या संयुक्त बळाची त्याला गरज होती आणि परिस्थिती तर विपरीत होती. सगळीकडे असंघटन, विस्कळीतपणा पसरला होता. स्वराज्य नाहीसे झाल्यानंतर सर्व लोकांतील आत्मप्रत्यय नाहीसा झाला होता. वाघिणीचे दूध म्हणून ज्या इंग्रजी विद्येस म्हणतात त्या विद्येचा असह्य प्रकाशाने नवशिक्षित तरुण दीपून जाऊन भान विसरले होते आणि इंग्रजांनी जे इथे आणले तेच ज्ञान उत्तम आणि येथील विद्या टाकाऊ अशी त्यांची धारणा झाली होती. पाश्चात्त्यांच्या उद्योगप्रियतेने त्यांना भारून टाकले होते. अशा आणि इतर अनेक कारणांनी हिंदुस्थानातील लोकांनी आपले उद्योग, आपली विद्या आपले सर्वस्व कुठलाही प्रतिकार न करता ब्रिटिशांकडे गहाण टाकले होते. सारा हिंदुस्थान कर्तव्यमूढ आणि



अगतिक झाला होता. एकूणच या स्थितीची टिळकांना कीव येत होती. तेव्हा कर्तृत्वशक्तीतच आपला तरुणोपाय आहे त्यातच येथील लोकांची पर्यायाने देशाची उन्नती आहे हे त्यांच्या विचारांती लक्षात आले.

त्यासाठी येथील मंडळींना यथोचित शिक्षित करून कार्यक्षम बनविणे हे त्यांनी मनाशी पक्के केले. या धोरणाला अनुसरून त्यांनी विष्णुशास्त्री यांच्या न्यू इंग्लिश स्कुलात आपला शिरकाव करून घेतला आणि राष्ट्रोपयोगी शिक्षण देण्याचे काम सुरू केले व नंतर ही व्यवस्था नीट लागल्यावर ती दुसऱ्यावर सोपवून त्यांनी लोकांना आपल्या कर्तव्याची जाणीव व कार्यक्षमता जागरूक करण्याच्या हेतूने कर्मयोगशास्त्र नावाचा भगवद्‌गीतेवर ग्रंथ लिहून लोकार्पित केला. त्या काळात या ग्रंथाने लोकजागृतीचे काम मोठ्या प्रमाणात केले होते.

महाराष्ट्राचा इतिहास लिहिताना महाराष्ट्रीय संतांनी राष्ट्रजागृतीची मोठी कामगिरी केली असे म्हटले जाते. मात्र ही गोष्ट सर्वथा खरी नाही. ज्ञानोबांनी बहुतांशी (निवृत्तिपर) ज्ञानेश्वरीकडे, तुकोबांनी (भक्तिपर) पंढरीकडे बाकी बहुतेक संतांनी निवृत्तीकडेच लोकांचा ओघ वळविला होता. त्याचा परिणाम लोकांस दैववादी करण्याकडे झाला. त्यामुळे आपल्या ऐहिक कल्याणाकडे व हक्काकडे दुर्लक्ष झाले. नाही म्हणायला वामन पंडित, सद्‌गुरू श्रीपाद वल्लभ आणि समर्थ रामदास यांनी लोकांना कर्मयोगाचा धडा दिला. परिणामी लोकांनी औरंगजेबास महाराष्ट्रात प्रवेश करू दिला नव्हता परंतु ही जागृती फार काळ टिकली नव्हती. लोकांमध्ये पुन्हा राष्ट्रभक्तीचे तेज प्रज्वलित करण्याचे काम टिळकांच्या कर्मयोगशास्त्र या ग्रंथाने केले.

भगवद्‌गीतेकडे अनेक विद्वानांनी वेगवेगळ्या दृष्टीने पाहिलेले आहे. कोणास ती ज्ञानपर दिसते तर कोणास तीत वासुदेव भक्ती, कोणास मोक्षदायिनी, तर कोणास पातंजल योगप्रदान वगैरे वगैरे. विविध विद्वानांना गीता अशी का वाटते याचे मुख्य कारण निरनिराळ्या आचार्यांच्या वेगवेगळ्या संप्रदायाच्या गीतेवरील भाष्य व टीकालेखनात आहे असे टिळकांना वाटत होते. विद्वानांनी गीतेवर प्रकट केलेली विविध मते विचारात घेतल्याने बुद्धी भ्रमित होऊन गोंधळ होण्याचा संभव असल्याने ही सारी मते बाजूला करून मूळ गीतेवरच चिंतन केल्याने आपले म्हणणे लोकांपर्यंत थेट पोहोचविता येईल असे त्यांना वाटले. त्यामुळे गीता ऐकल्यानंतर अर्जुनावर जसा कर्तव्यकठोर होण्याचा परिणाम झाला तसाच तो येथील लोकांवर स्वच्छपणे साधता येईल हाच गीतेचा खरा समजण्याचा राजमार्ग आहे असे टिळकांचे मत बनले.

टिळकांनी गीतेचा अर्थ समजण्याकरिता वयाच्या १६ व्या वर्षापासून प्रयत्न सुरू केले होते. अखेर मंडालेच्या एकांतवासात त्यांच्या तपश्चर्या पूर्ण होऊन त्यास खऱ्या अर्थाचा साक्षात्कार झाला. उठा जागे व्हा आणि (भगवंताने दिलेले) हे 'वर' समजून घ्या असा सल्ला त्यांनी होतकरू जनतेला दिला. यातच उन्नतीचे, मोक्षाचे, स्वराज्याचे बीज आहे आणि हेच गीतेतील रहस्य आहे, भगवान श्रीकृष्णाचे आश्वासन आहे हे त्यांनी जनतेस पटवून दिले. देशकालानुसार अंगीकृत केलेले कर्म प्रत्येकाने केलेच पाहिजे असे गीतारहस्यात सांगितले आहे. ते निष्काम असल्याने चित्तशुद्धीचे मोठे साधन आहे. ज्ञान, संन्यास, कर्म व भक्ती यांच्या योग्य मिलापाने इहलोकी आयुष्यात कोणता मार्ग स्वीकारायचा त्याप्रमाणे सर्व पंथांच्या लोकांचा संग्रह करून आपल्या कार्यकर्तृत्वाची वाट दाखवून आपल्यातील निष्क्रियतेला पूर्णविराम देण्यास बाध्य करणे, त्यायोगे जनसमूहाची शक्ती एकवटून राष्ट्रकार्यास कामी लावणे हेच लोकमान्यांना सांगायचे होते. त्यांचा हाच उपदेश आपण आज आचरणात आणायला हवा.

९९६००३११४८

## धर्म-संस्कृती

# श्री गीता : पहिला अध्याय 'अर्जुनविषादयोग'

**प्रा. दिलीप जोशी**


श्रीमद्‌भगवद्‌गीता हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. अठरा अध्याय असलेली गीता भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग, सांख्ययोग असे विविध योग आपल्याला सांगते. श्री गीतेचा पहिलाच अध्याय 'अर्जुनविषादयोग' नावाने संबोधित आहे. योगाचे कोणतेही ग्रंथ धुंडाळून पाहा. इतर सर्व योग प्राचीन योगशास्त्रात आहेत; पण विषाद नावाचा योग आपल्याला कुठेच, कोणत्याही योगाच्या ग्रंथात आढळत नाही. तरीही श्रीगीतेच्या पहिल्याच अध्यायाला श्री व्यासांनी 'अर्जुनविषादयोग' असे का नामाभिधान केले असेल? खरं तर पहिल्या अध्यायाविषयी मला नेहमीच कुतूहल वाटते. श्री गीता सांगितली भगवंतांनी, पण सुरुवात त्यांनी केली नाही. 'धृतराष्ट्र उवाच'ने श्री गीतेचा प्रारंभ म्हणजे दुष्टात्मा धृतराष्ट्र यांनी केला. ज्याचे तोंड पाहू नये त्याचे नाव प्रारंभीच उच्चारावे लागते. असे का? दुसरे म्हणजे पहिल्या अध्यायात पूर्ण अध्यायभर अर्जुन नकारात्मकतेने ग्रासलेला दिसतो. एवढा नितांतसुंदर तत्त्वज्ञानी ग्रंथ, पण सुरुवात अशी नकारात्मक का? हेही कुतूहलच आहे. आज त्याचाच विचार आपण करू.

'विषाद' हा संस्कृत शब्द असून उदासीनता, निरुत्साह, निरसता, निस्तेज, शोक आणि दुःख असा त्याचा अर्थ होतो. ही आपली मनोअवस्था आहे. यालाच अंतर्मनाची खिन्नता म्हणतात. या अस्वस्थ अवस्थेत कशातच मन लागत नाही. विषाद स्थितीत कोणतीच साधना, अनुष्ठान, अर्चना होऊ शकत नाही. मनाची ही अवस्था कोणालाच नको. कारण विषाद आपल्यातला आनंद नष्ट करतो. म्हणून शक्यतो ही मानसिक स्थिती टाळण्याचा सर्वांचा प्रयत्न असतो. तरीही भगवान व्यासांनी याला विषादयोग म्हटले आहे.

बरं, व्यासांचे कुठलेच शब्द निरर्थक, अकारण नसतात. विषादयोग या शब्दामागेही त्यांचा कुठला तरी हेतू सुनिश्चित आहे. युद्धभूमीवर आल्यावर अर्जुनाने भगवंताला आपला रथ दोन्ही सेनांच्या मध्ये नेण्यास सांगितला आणि त्याची नजर सर्वांवर पडताच तो मोहग्रस्त झाला.

**जेणें संग्रामीं हरु जिंतिला । निवातकवचांचा ठावो फेडिला ।**
**तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजीं ॥**

त्याचा अहंभाव, अज्ञान आणि ममत्व जागे झाले. भावनांचा अतिरेक होऊन तो मोहग्रस्त आणि शोकाकुल झाला. यालाच विषाद म्हणतात. विषाद झालेल्या अर्जुनाची शक्ती क्षय होऊन तो गलितगात्र झाला. बऱ्याचदा जीवनात आपल्या कुणालाही ही अवस्था सहजपणे येते. त्यासाठी कोणतेही विशेष प्रयास करण्याची गरज नसते. उदा. वाईट बाबींसाठी प्रयत्न करावे लागत नाहीत, त्या आपोआप जडतात. चांगल्या बाबींसाठी मात्र जाणीवपूर्वक झटावे लागते. भगवान व्यासांनी विषादयोग म्हटले. कारण विषाद अनुभवल्याशिवाय निखळ आनंदाचे महत्त्व कसे कळणार? एखाद्याला कोंडून ठेवले तरच त्याला



सुटण्याचा प्रयत्न आणि बाहेर मोकळेपणाचा आनंद मिळणार आहे. साखरेचे महत्त्व कडू गोळी खाल्ल्यावरच समजते. नेमके अर्जुन युद्धाच्या प्रारंभीच मोहग्रस्त झाला म्हणून तर सर्वांगसुंदर श्रीमद्‌भगवद्‌गीता उदयास आली आणि त्याच्या ठायी असलेला मी पणा नष्ट झाला.

साधक साधना करतो तेव्हा त्याचे मन उदासीन, खिन्न आणि निराश असेल तर साधना सिद्ध कशी होईल? जमिनीत अंकुर फुटायचा असेल तर त्यासाठी जमीन तयार करणे आवश्यक आहे. तेच मानसिक अवस्थेचे आहे. विषाद प्राप्त झालेल्या अर्जुनाच्या मनातील संभ्रम काढण्यासाठी भगवंताला 'नित्यनूतन असे गीतातत्त्व' सांगावे लागले.

'तो स्वये सर्वेश्वरू प्रत्यक्ष अनुवादीला' यासाठी प्रमुख कारण ठरला तो अर्जुन विषाद. अर्जुनाच्या विषादामुळेच 'स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णू, श्रीगीता हा प्रश्नु अर्जुनेशी' म्हणूनच श्री गीता निर्माणाचे कारण अर्जुनाचा विषाद असल्यामुळे विषादालाही योगत्व प्राप्त झाले. प्रत्यक्ष परमेश्वर सोबत असूनही अर्जुन मोहमायेत गुंतला तिथे आपले काय?

**'आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।**
**मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा ॥**
**ऐसियांतें कैसेनि मारूं? । कवणावरी शस्त्र धरूं?।**
**निजहृदया करूं । घातु केवीं?॥'**

असे म्हणणारा अर्जुन अनेक शंकाकुशंका, अनेक प्रश्नांनी रोमांचित होतो.

**सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥**

त्यातून निर्माण होते गीतातत्त्व.

**गुंतलो होतो अर्जुनगुणे, मुक्त जाहलो तुझिया गुणे**
**आता सांगणे पुसणे, काहीच न लगे!**

गीता ऐकल्यावर तो परिपूर्ण अवस्थेपर्यंत येतो.

पहिल्या अध्यायात सांगितलेला अर्जुनगुण म्हणजे अर्जुन विषादयोग आहे. या अध्यायाचे अजून एक वैशिष्ट्य आहे की, विषाद अवस्थेत अर्जुनाने भगवंताला संबोधित करताना विशिष्ट ठिकाणी विशिष्ट नामोल्लेख केला आहे. अच्युत, कृष्ण, केशव, मधुसूदन, जनार्दन अशी ती कार्यस्वरूप संबोधन आहेत. अच्युत म्हणजे जो आपल्या स्व स्थितीपासून कधीही ढळला नाही. कृष्ण म्हणजे सर्व जीवमात्रांचे आनंदस्वरूप आश्रयस्थान, केशव म्हणजे केशी राक्षसाचा वध करणारा, मधुसूदन म्हणजे मधू नावाच्या राक्षसाचा नि:पात करणारा, जनार्दन म्हणजे जगत्पालक परमात्मा होय.

इथे अर्जुनाला स्पष्ट करायचे की, हे भगवंता, केशवा, मधुसूदना, तू ज्यांचा वध केला ते केशी आणि मधू राक्षस तुझ्यासाठी परके होते. माझ्या समोर मात्र माझे स्वकीय आहेत. तूच आनंदस्वरूप आणि सर्वांचे निवासस्थान असलेला तू युद्धासाठी कसा सिद्ध होतो. अर्जुनाची विषाद अवस्था असली, तरी अर्जुन त्याही स्थितीत चतुरपणे देवाला पटवून देण्यासारखे प्रश्न विचारतो. 'जेथ चातुर्य शहाणे झाले' चातुर्याला शहाणपण यावे, अशी तो शंका विचारतोय.

**'न काङ्‌क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।**
**किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ॥'**

कोणत्याही स्थितीत भगवंतांनी त्याला म्हणावे की, 'बरं राहू दे युद्ध ! सोड युद्धभूमी!' पण भगवंत ते! ते उपदेशाने परिवर्तन तर करणारच! असो. पहिल्या अध्यायात स्थान वर्णन, योद्ध्यांची नावे, वाद्यांची नावे, शंखांची नावे असे सगळे वर्णन आहे. श्रीकृष्ण अर्जुनाचा संवाद व्यासांनी महाभारतात दिला आहे. श्री गीता ध्यान मंत्रात हे सुंदर वर्णन आहे.

**'ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं**
**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतं ।**
**अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीं**
**अम्ब त्वामनुसन्दधामि भगवद्गीते भवद्वेषिणीं ॥१॥'**

विषादयोग आपल्याला अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा आहे. मनाच्या खिदन अवस्थेकडून आनंद अवस्थेकडे नेणारा हा अध्याय आहे. अर्जुनाचा अर्जुन गुण म्हणजे अर्जुनाची मोहग्रस्त स्थिती. त्यातूनच त्याची झालेली मनोवस्था म्हणजे विषाद. हा विषादच भगवान श्रीकृष्णाच्या तोंडून जगाचे सर्वांगसुंदर तत्त्वज्ञान श्रीमद्‌भगवद्‌गीता निर्मितीचे कारण ठरला. म्हणून विषाद असून विषादयोग म्हटले आहे.

९८२२२६२७३५

## वेध

**विजय निचकवडे**

# रमीत रमलेले 'माणिक'

आम्ही शाळेत जायचो ना, तेव्हा एखाद्या विषयाचा वर्ग सुरू होताच हाताच्या मनगटावरच घड्याळ मिनिटा-मिनिटाला पाहण्याची सवय होती. एकदा शिक्षकांचा ओरडा पडला अन् हाताचं घड्याळ कायमचं निघून गेलं. आता याचा आणि लिखाणाचा काय संबंध, असं आलं असेलच डोक्यात! हे एवढ्यासाठीच की, एखाद्याने एखादी चूक लक्षात आणून दिली की, सुधारली जाऊ शकते. पण कदाचित राजकारण्यांना हे लागू नसावे. आता माणिकरावांचेच पहा ना, अत्यंत संवेदनशील आणि तेवढ्याच महत्त्वाच्या विभागाचे मंत्री आहेत, पण कायम वादाच्या भोवऱ्यात असतात. समज दिलीही जात असेल, पण ते समजून घ्यायचंच नाही, असा निर्धार त्यांचा असावा! नाहीतर रमीत रमलेले माणिकराव पाहण्याची वेळ आमच्यावर कशाला आली असती! सभागृहात जिथे राज्याच्या कल्याणाचे निर्णय होतात, लोकांच्या व्यथा मांडल्या जातात, त्या ठिकाणी ही असंवेदनशीलता नक्कीच चिंतेचा विषय ठरतो. अप्रत्यक्षपणे याची झळ आपसूकच शासनकर्त्यांनाही बसते. आमच्या लोकप्रतिनिधींकडून अनेक अपेक्षा आहेत. आमच्या व्यथा मांडण्यासाठी त्यांना सभागृहात आम्ही पाठवितो. सामान्यांचा आवाज तेथे उजागर करून कल्याणकारी निर्णयातून समाजाचे भले व्हावे, अशी माफक अपेक्षा या मागची असते. पण आज ही परिस्थिती पाहायला मिळते, ते पाहून राजकारण कुणीकडे चालले असे वाटते. राजकारणातून समाजकारण म्हटले जाते. मात्र जो जोर समाजकारणावर दिला जायला हवा, तो दिला जात नाही. कदाचित लोकांनाही आता खास अपेक्षा राजकारण्यांकडून राहिल्या नसाव्यात. कारण राजकारणात नित्याने जे काही पुढे येत आहे, ते पाहून लोकांपेक्षा स्वहित, आपली प्रतिष्ठा, एकमेकांवर कुरघोडी हाच राजकारण्यांचा धर्म झाला की काय, असे वाटू लागते. याला अपवाद अनेक आहेत; जे अपवाद आहेत, त्यांच्याकडेही पाहण्याचा दृष्टिकोन अशा लोकांमुळे बदलतो, हे तेवढेच खरे!


विधानभवनाला आम्ही लोकशाहीचे मंदिर म्हणून संबोधतो, पण तेथे काय तर वेगवेगळ्या आमदारांकडून एकमेकांवर शाब्दिक चिखलफेक पाहायला मिळते. यापुढे जात आता एकमेकांच्या कार्यकर्त्यांना हाणामारी, आमदार एकमेकांना वाहत असलेल्या शिव्यांची लाखोळी या प्रकारामुळे असे आमदार खरंच आपले प्रतिनिधित्व करण्यास समर्थ आहेत का? असा प्रश्न निर्माण होतो. आता तर राज्याच्या मंत्र्यांचा एक प्रताप पुढे आला आहे. कृषीसारख्या अत्यंत संवेदनशील विभागाचे मंत्री असलेल्या माणिकराव कोकाटे हे चक्क सभागृहात मोबाईलवर जंगली रमी खेळतानाची चित्रफीत व्हायरल झाली आणि हा विषय प्रचंड तापला. मंत्री माणूस आहे, कधी तरी त्यालाही गेम खेळण्याचा मोह होऊ शकतो; मात्र तो कुठे खेळला पाहिजे, याचेही तारतम्य बाळगायला नको का? विधान परिषद सभागृहात प्रश्नोत्तरांचा तास सुरू असताना रमीत रमलेले माणिकराव सध्या चांगलेच अडचणीत आले आहेत. ढेलकांचे पंचनामे करायचे का? कर्जमाफीच्या पैशातून शेतकरी लग्न, साखरपुडे करतात अशा व्यक्तव्यांमुळे आधीच ते लोकांच्या आणि पक्षनेतृत्वाच्या नजरेतून काही अंशी उतरले. आता रमीच्या नादात आणखी अडचणीत आले आहेत. या आधी त्यांना समज दिली असावीच; मात्र ते मंत्री आहेत. मग कुणी सांगायचं आणि त्यांनी ऐकायचं असं होईल का? म्हणून कदाचित त्यांनी रमीचा डाव मांडून पाहिला असावा? पण पत्ते उलटे पडले. कृषी खाते ग्रामीण भागाशी नाळ जुळवून ठेवणारे आहे. शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा हा विषय असल्याने त्या विभागाच्या मंत्र्यांनी तेवढे संवेदनशील राहणे अपेक्षित आहे. नाहीतर देशाचे कृषी मंत्री असलेल्या शिवराज सिंह चव्हाण यांनी कशाला पावसात बाजार समिती आवारातून धान्य वाहून गेलेल्या महाराष्ट्रातील वाशीम जिल्ह्यातील गौरव नावाच्या एका शेतकऱ्याला स्वत: फोन करून त्याचे सांत्वन केले आणि मदत देण्याचे स्पष्ट करीत धीर दिला असता! ते तर देश सांभाळतात, तरी त्यांना महाराष्ट्रातील एका शेतकऱ्याची व्यथा पाहून राहवले नाही! देशाचे कृषी मंत्री आपल्या वागण्या-बोलण्यातून एक आदर्श निर्माण करू शकतात तर राज्याच्या मंत्र्यांनी त्या वाटेने का जाऊ नये! खरं तर माणिकराव कोकाटेंना मंत्रिपद दिलं गेलं ते, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना डावलून. इतक्या मोठ्या प्रमाणात विश्वास टाकून पक्षनेतृत्वाने जर एक महत्त्वाचं खातं आपल्याकडे सोपविलं असेल तर त्या खात्याचे महत्त्व जपणे काम कुणाचे? गोष्टी काही दिवस चर्चेत राहतील आणि संपतील. तसाच रमीचा गेमही काही दिवसांनी लोक विसरतील. पण मंत्री म्हणून शेतकऱ्यांसाठी केलेली सकारात्मक कामे कायम स्मरणात राहतील. त्यामुळे वादग्रस्त होण्यापेक्षा वादापासून दूर राहणारे मंत्री म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करण्यास हरकत काय? आज रमीचा हा गेम राज्याचे कल्याण करण्यासाठी पुढे पावले टाकीत असलेल्या सरकारवरही शिंतोडे उडविण्यास पुरेसे आहे. अशावेळी रमीत रमलेल्या माणिकरावांना शिकण्याशिवाय पर्याय नाही!

९७६३७१३४१७

## वाचक पत्रे

### देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस २२ तारखेला झाला. आपल्या वाढदिवशी कोणीही बॅनर, पोस्टर, जाहिराती छापू नयेत, याची दरवर्षी काळजी घेतात, तशी ती यावर्षीही घेतल्याचे दिसते. हे त्यांचे वेगळेपण ठरावे. खरे तर असे वेगळेपण जोपासणे हे त्यांचे वैशिष्ट्य ठरते. हे ते मुद्दाम करतात असे नाही तर ते ज्या विचार



परिवारातून येतात, तो विचार ते सहजतेने जगतात. ते राजकारणात असूनही कमी व मुद्देसूदच बोलतात. त्यामुळेच बोललेले शब्द किंवा वाक्य परत घेण्याची वेळ त्यांच्यावर येत नाही किंवा माझ्या बोलण्याचा विपर्यास केला गेला असे स्पष्टीकरण त्यांना कधी करावे लागत नाही. राजकारणात असल्यामुळे आपण सर्वज्ञानी आहोत असे न समजता, कुठल्याही विषयाचा सखोल अभ्यास करूनच ते बोलतात. राजकारणात मुख्य स्थानी असूनही त्यांनी आपल्या पुढच्या पिढ्यांची सोय करण्यासाठी कुठल्याही संस्था निर्माण केल्या नाहीत, उलटपक्षी नागपुरात एक दोन अतिशय चांगल्या संस्थांची निर्मिती करून आपल्या सहकाऱ्यांना त्या चालवण्यासाठी सुपूर्द केल्या. स्वतः निर्माण केलेल्या संस्था दुसऱ्यांना सुपूर्द करणे हे राजकारणातील व्यक्तींना जमतेच असे नाही. उलटपक्षी ते फारच अवघड आहे. तेही त्यांनी सहजतेने केले आहे. विचार हे केवळ समजून चालत नाही तर ते आचरणात आणण्यासाठी असतात, नव्हे त्याची सुरुवात स्वत:पासूनच करणे चांगले असते हेही त्यांना उमगले आहे. राजकारणात असूनही त्यांनी आपली प्रतिमा, चारित्र्य व विश्वासार्हता जपली आहे.

काही जणांना वाटते की त्यांनी आपले स्पर्धक संपविले. हे खरे नाही. एका विचारवंताने म्हटले आहे की आपला विरोधक आत्महत्या करायला निघाला असेल तर त्याला न थांबविण्यातच खरा शहाणपणा असतो. कदाचित हे त्यांनी केले असावे, हा त्यांच्या चातुर्याचा भाग असू शकेल, हा त्यांचा दोष असू शकत नाही. खरे तर मानवी जीवनाचे हे रहस्य आहे की जो दुसऱ्यासाठी खड्डा खोदतो, नियती त्या खड्ड्याच्या बाजूला दुसरा खड्डा त्याच व्यक्तीसाठी खोदत असते. ज्याला हे उमगले आहे, तो त्या वाटेने जातच नाही. देवेंद्रजी हे त्यापैकीच एक आहेत. खरे तर समन्वयवादी भूमिका हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. आजकाल अमुक अमुक त्यांच्याजवळचा आहे, राईट हॅण्ड आहे, लेफ्ट हॅण्ड आहे असे काहींना वाटते, पण ते खरे वाटत नाही. एकाच वेळी सर्व आमदार त्यांच्याजवळचे आहेत व नाहीतही. कारण प्रामाणिकता, विश्वासार्हता, अभ्यासूवृत्ती, सचोटी, अफाट मेहनत करण्याची तयारी, तोलून मापून बोलण्याची सवय, आपल्या विचारातील अविचल निष्ठा, या गोष्टी असलेले तर त्यांच्या जवळचे आहेतच, पण आज ज्यांच्या जवळ या गोष्टी नाहीत तेही त्यांच्या जवळचेच आहेत. कारण त्यांना ते या मार्गावर आणू इच्छितात. असामान्य नेता हा शब्द त्यांच्यासाठी वापरावा असे वाटते, हो पण ही थोडी घाईच ठरेल. कारण आता तर ते आपल्या राजकीय कारकीर्दीच्या ऐन मध्यावर दिसत आहेत.अजून बराच प्रवास बाकी आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. श्रीकांत पांडे**/नागपूर

### राजकारणातील दोन ध्रुव

राज्यातील मुरब्बी राजकीय नेते म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांचा वाढदिवस मंगळवारी झाला. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचे आणि प्रभावशाली नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात अगदी सामान्य कार्यकर्त्यापासून झाली. त्यांनी राज्याचे मुख्यमंत्रिपद, उपमुख्यमंत्रिपद आणि विरोधी पक्षनेतेपद अशा प्रमुख भूमिका यशस्वीपणे पार पाडत ते पुन्हा तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणातील चाणक्य म्हणून ज्येष्ठ नेते शरद पवार यांची ओळख होती. पण त्यांना मागे टाकत सलग तिसऱ्यांदा भाजपासाठी चाणक्य ठरले, ते देवेंद्र फडणवीस. याचे मुख्य कारण, भाजपाला निवडणुकीत १०० पेक्षा जास्त जागा मिळवून देण्याची हॅट्‌ट्रिक त्यांनी साध्य करून दाखवली आहे. २०१४ मध्ये भाजपा-शिवसेनेची युती नव्हती, तेव्हा फडणवीस भाजपाचे प्रदेशाध्यक्ष होते. पक्षाला १२२ जागा मिळाल्या, सरकार आले आणि फडणवीस मुख्यमंत्री झाले. २०१९ मध्ये युती झाली. भाजपाला १०५ जागा मिळाल्या तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत १३२ जागा मिळाल्या. एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व, प्रशासनावरील मजबूत पकड आणि राजकीय धोरणांची अचूक मांडणी यासाठी ते ओळखले जातात.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला अपयश आल्यानंतरही न खचता त्यांच्या पक्षाने विधानसभा निवडणुकीत ४१ मतदारसंघांमध्ये अभूतपूर्व यश मिळविले. याआधीही त्यांनी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून काम पाहिले आहे. प्रशासनावर असलेली त्यांची उत्तम पकड, प्रशासकीय क्षमता आणि स्पष्टवक्तेपणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात ते एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. राज्यातील या दोन कर्तृत्ववान राजकीय व्यक्तींचा जन्मदिवस एकाच दिवशी यावा, याला योगायोग म्हणावा की चमत्कार?

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# हिंगोली येथील उपोषणाची दखल न घेतल्यास पिंपळदरी येथे रास्तारोको

## औंढा नागनाथ आदिवासी युवक कल्याण संघाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जुलै**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची विशेष पदभरती अधीसंख्या १२५२० रखडलेली पद भरती व अनुसूचित जमाती ८५००० रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावे, या मागणीसाठी १६ जुलै २०२५ पासून हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालय येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या उपोषणाची शासनाने दखल न घेतल्याने रास्ता रोको आंदोलन बुधवारी २३ जुलै रोजी आदिवासी युवक कल्याण संघटनेच्या वतीने औंढा तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे.

हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयसमोर आदिवासी विद्यार्थ्यांचे दि १६ जुलै २०२५ पासून साखळी उपोषण सुरू आहे.या उपोषणाला आठ दिवस झाले असून अद्यापही शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही. साखळी उपोषणकर्ते विद्यार्थ्यांच्या मागण्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असून सुद्धा आदिवासी विशेष पद भरती झालेली नाही. यामुळे १२५२० पदांची भरती तात्काळ करण्यात यावी. शासकीय व निमशासकीय पदभरती मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात यावे. शासन निर्णय २०१९ नुसार अनुसूचित जमाती जात पडताळणी कार्यालय समितीकडे प्रलंबित असलेल्या सशर्थ वैधता (कंडिशनल व्हॅलिडीटी) प्रकरणाची चौकशी करून तात्काळ कार्यवाही करा. अनुसूचित जमाती प्रवर्गातील ८५००० रिक्त पदांची पदभरती तात्काळ सुरु करण्यात यावी.आदिवासी विद्यार्थ्यांचे सार्वजनिक आरोग्य विभागातील १५४१ गट अ ब क ड च्या संवर्गातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनुसूचित जमाती अधिसंख्य पदावर १०९ जणांना वर्ग केल्यानंतर ती पदे रिक्त दाखवायला पाहिजे .हाती केवळ ८० पदे रिक्त दाखवलेली आहेत तर उर्वरित २९ पदे तात्काळ भरण्यात यावीत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे टीआरटीआय यांच्यामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी सहा महिने प्रशिक्षण पोलीस भरती एम पी एस सी बँकिंग एसएससी इत्यादी प्रशिक्षणा ला खंड पडला असून प्रशिक्षण तात्काळ चालू करण्यात यावीत वरील मागण्या पूर्ण न करता आठ दिवसापासून विद्यार्थी उपोषणाला बसून सुद्धा शासनाने त्यांची दखल न घेतल्यामुळे संपूर्ण आदिवासी समाजाचा अवमान झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी समाज संतप्त झाला असून २५ जुलै रोजी पिंपळदरी फाटा येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन आदिवासी युवक कल्याण संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

या निवेदनावर आदिवासी युवक कल्याण संघटनेचे तालुकाध्यक्ष मारोती बेले, उपाध्यक्ष शैलेश रिठे सुदाम राव खोकले, पांडुरंग मेटकर, अशोक दळवे, रुस्तुम बेले माधव रिठे, विठ्ठल गुहाडे, सुनील काळे, धनंजय ठाकरे अनिल पोटे, श्रीराम शेळके, साहेबराव मुकाडे, शिवाजी धनवे, जनबा डहाळके, केशव येळणे, पवन जुमडे नारायण कहाळे, प्रल्हाद मुकाडे, अंकुश बंदुके, सदाशिव धनवे यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत.

# हिंगोलीहून ऱ्हदय शस्त्रक्रियेसाठी २० बालके मुंबईला रवाना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जुलै**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच केंद्र शासनाचा महत्वपूर्ण राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या वैद्यकीय पथकाकडून २ डी इको शिबीरात तपासणी केल्यानंतर २० बालकांना दि २२ जुलै रोजी ऱ्हदयशस्त्रक्रियेसाठी मुंबई येथील बालाजी हॉस्पीटल येथे रवाना करण्यात आले आहे.

येथील जिल्हा सामान्य रूग्णालयातून या बालकांना व त्यांच्या नातेवाईकांना एका लक्झरी बस मधून रवाना करण्यात आले आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय पथकाकडून ० ते १८ वर्षे वयोगटातील संदर्भीत संशयीत ऱ्हदयरूग्णाकरिता दि ७ जुलै रोजी जिल्हा रूग्णालय येथे जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली २ डी इको तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी मुंबई येथील बालाजी हॉस्पीटल येथील तज्ज्ञ डॉ जयश्री मिश्रा, डॉ प्रतीक मिश्रा व त्यांचे टीम यांनी बालकांची तपासणी केली. या शिबीरात २५ बालकांना पुढील ऱ्हदयशस्त्रक्रिया करण्याकरिता संदर्भीत करण्यात आले होते. त्यानुसार दि २२ जुलै रोजी ऱ्हदय शस्त्रक्रियेसाठी बालकांना घेवून जाण्यासाठी लक्झरी बस पाठविण्यात आली आहे. २० बालकांना बालाजी हॉस्पीटल भायखळ मुंबई येथे रवाना करण्यात आले आहे. या बसला अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ दिपक मोरे यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले आहे. यावेळी बालरोग तज्ञ डॉ गोपाल कदम, डॉ विशाल पवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ शैलजाकृप्पा स्वामी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ जोगदंड, डॉ गजानन चव्हाण, डॉ विनोद बीडकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक शंकर तावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम पर्यवेक्षक लक्ष्मण गाभणे, डॉ संतोष चांदूरकर, ज्ञानोबा चव्हाण, राजेंद्र खंदारे, बद्रीनाथ शेळके आदींनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत राष्ट्रसेविका समितीच्यावतीने गुरूपूजन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**



दरवर्षी प्रमाणे साजरा होणारा गुरुपौर्णिमा आणि समर्पण हा उत्सव याही वर्षी राष्ट्र सेविका समिती हिंगोली नी जिल्हाभरात मोठया उत्साहत साजरा केला. रविवार दि. २० जुलै २०२५ ला शहरातील तापडिया इस्टेट वस्तीत महेश उद्यान आणि शहरातील तिरुपती नगर येथील वरद मंगलकार्यालयात हा उत्सव साजरा करण्यात आला. हिंगोली जिल्ह्यात राष्ट्र सेविका समिती च्या माध्यमातून महिलांना आणि सामाजिक जाणीव ठेवत अनेक उपक्रम राबविण्यात येतात. महिलांना राष्ट्रविषयीं प्रेम आणि आपल्या राष्ट्र कर्तव्याची जान निर्माण करने आणि त्यांना सबल बनविण्याचे काम ही राष्ट्र सेविका समिती करते. महिलांना शाखेसी जोडून त्याचे अनेक उपक्रम राबविले जातात. कळमनुरी तालुक्यात ही हा उत्सव मोठया उत्साहत साजरा करण्यात आला. यावेळी सौ वर्षा देशमुख, अ‍ॅड सौ.रीना झंवर, सौ विभावरी डुब्बेवार, सौ रश्मी जोशी, डॉ दीपाली धाडवे, डॉ. सोनाली भरतीया आदी अनेक सेविका उपस्थित होत्या. या वेळी बौद्धिक कार्यक्रम ही झाला. भगवा ध्वज हा गुरुस्थानी असल्याने सर्वांनी त्यांना प्रणाम केला.



**हिंगोली– येथील कै शिवाजीराव देशमुख सभागृहात बुधवारी माळी समाजाच्यावतीने संत शिरोमणि सावता महाराज संजीवन समाधी सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी ह भ प ओमप्रकाश नागुलकर महाराज यांचे प्रवचनाचा कार्यक्रम झाला. यावेळी जिल्हाध्यक्ष चंद्रकांत लव्हाळे, संदीप काळे, बालाजी सोनवणे, केशव जांबुतकर, सुभाष धामणे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### मुख्याध्यापक संघातर्फे डॉ अंभोरे यांचा सत्कार



हिंगोली– मराठवाडा भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय विद्यामंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांचा मुख्याध्यापक संघातर्फे सत्कार करण्यात आला. सत्कार करताना विठ्ठलराव सोळंके सचिव हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघ, विठ्ठलराव मुटकुळे प्राचार्य आडगाव, बाबासाहेब इंगोले प्राचार्य अन्नपूर्णा विद्यालय बसंबा, माधव जाधव सर मुख्याध्यापक आदर्श माध्यमिक विद्यालय हिंगोली, दत्तराव घोंगडे मुख्याध्यापक संभाजी विद्या मंदिर हिंगोली, विशाल शिंदे मुख्याध्यापक गांधी विद्यामंदिर माळ धामणी यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या वतीने दिनांक १५ जून २०२५ रोजी संत एकनाथ रंगमंदिर छत्रपती संभाजीनगर येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

### महात्मा फुले मागासवर्ग योजनेसाठी अर्ज करा

हिंगोली– महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या जिल्हा कार्यालय हिंगोली कार्यालयासाठी सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजनेंतर्गत ९० व बीज भांडवल योजनेंतर्गत ९० कर्ज प्रकरणाचे तसेच थेट कर्ज योजनेंतर्गत ३० कर्ज प्रकरणाचे उद्दिष्ट आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील इच्छूक अर्जदाराने वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑगस्ट, २०२५ अखेर पर्यंत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. तसेच कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, कोटेशन, प्रकल्प अहवाल, व्यवसायाचा जागेचा पुरावा, दोन पासपोर्ट साईज फोटो, व्यवसायाचे लायसन्स इत्यादी कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह दोन प्रतीत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. हिंगोली यांनी केले आहे.

### सरजुदेवी शाळेचे चित्रकला स्पर्धेत यश

हिंगोली– येथील सरजुदेवी भिकुलाल भारुका आर्य कन्या माध्यमिक विद्यालय येथील ऋतुरंग राज्यस्तरीय चित्रकले स्पर्धेत २४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. यामध्ये वर्ग ५ वी ते ७ वी मध्ये सर्वप्रथम कु. शिवानी गजानन जगताप द्वितीय कु. वैष्णवी दीपक तापडिया कु. ईश्वरी मधुसूदन बाबरे वर्ग ८ वि ते १० वी सर्वप्रथम कु. पल्लवी दीपक सरकटे, द्वितीय कु. प्रणाली माणिक पंडित तृतीय कु.धनश्री पंडित गादेकर. यशस्वी विद्यार्थी प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थाचालक, मुख्याध्यापक यांनी सत्कार केला.

# शिरड शहापूर येथे आरोग्य केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची अचानक भेट

**तभा वृत्तसेवा**
**शिरड शहापूर, २३ जुलै**



औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दि २३ जुलै रोजी जिल्हा परिषद शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे अचानक भेट दिली. यावेळी आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाही त्यामुळे जिल्हाधिकारी गुप्ता यांनी चांगलेच सुनावले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्या शाळा उर्दू शाळा येथे अचानकपणे भेट देऊन शाळेतील शैक्षणिक कामासंबंधी माहिती घेतली. शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भेट देऊन तेथील आरोग्य संबंधी माहिती घेतली तसेच प्रसूतीगृह, शस्त्रक्रियागृह, ओपीडी याची पाहणी केली तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना औषध उपचारा संबंधी प्रश्न विचारले परंतु वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना या प्रश्नाचे उत्तर बरोबर देता आले नाही त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे जिल्हाधिकारी गुप्ता यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना सुनावले व नाराजी व्यक्त केली. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसूती कमी प्रमाणात होत असते असे त्यांना निदर्शनास आले त्यांनी प्रसूती वाढविणे, सर्व कर्मचारी यांना कामे वाढवून देणे, स्वच्छता ठेवण्याबाबत तसेच कुटुंब कल्याण कॅम्प सुरू करणे याबाबत सूचना दिल्या.

# कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जुलै**



राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा द्यावा या संदर्भामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस( शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतीने बुधवार( दि. २३) रोजी औंढा तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे.सदरील निवेदन तहसीलदार हरीश गाडे यांनी स्वीकारले आहे.

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा मुख्यमंत्री यांनी राजीनामा घ्यावा, कोकाटे हे कृषिमंत्री झाल्यापासून अनेक वेळा शेतकऱ्यांबद्दल वेगवेगळे वक्तव्य करून शेतकऱ्यांना त्यांनी नेहमीच अपमानित केले आहे. कृषिमंत्री यांनी दि.२० जुलै रोजी अधिवेशन सुरू असताना थेट सभागृहात मोबाईलवर पत्त्याचा रमी गेम जुगार खेळताना कृषिमंत्री कोकाटे यांचा व्हिडिओ प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या या कृतीमुळे जनतेमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये कृषिमंत्री यांच्या बद्दल प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री यांनी तात्काळ कृषिमंत्री यांचा राजीनामा घ्यावा अशी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष रमेशराव सानप, दिलीप राखोंडे, संभाजी चव्हाण,चंद्रकांत सुतारे, स्वप्निल मुळे, विठ्ठलराव पाटील, वसंत राखोडे, सुरेश आहेर, प्रकाश गायकवाड, एकनाथ खंदारे, बाळासाहेब कीर्तने, गजानन व्यवहारे, आदित्य डुबे, ज्ञानेश्वर अंभोरे, किशोर राऊत, मनीष दावलबाजे, विठ्ठल पटवे प्रसाद गायकवाड यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# चिखली येथील शेतकऱ्याची कर्जाला कंटाळून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जुलै**

कळमनुरी तालुक्यातील चिखली येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जाला कंटाळून गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, कळमनुरी तालुक्यातील चिखली येथील शेतकरी बालाजी चव्हाण वय ४६ यांना त्यांच्या नावे १० गुंठे तर मुलाच्या नावे १ एकर शेती आहे. घरी पत्नी, व दिव्यांग मुलगा असा परिवार आहे. शेतीवरच या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मुलाच्या नावे असलेल्या जमिनीमधील पिकांचे दरवर्षी पुराच्या पाण्यामुळे नुकसान होते. दरम्यान शेतीवर त्यांनी आखाडा बाळापूर येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे तीस हजार रूपये कर्ज घेतले होते. यावर त्यांनी शेतात सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र नापिकी व कर्ज कसे फेडावे याची चिंता त्यांना सतावत होती. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते अस्वस्थ होते.

घरात जेवण करतो असे म्हणत स्वयंपाक घराचा दरवाजा बंद करून त्याठिकाणी असलेल्या लोखंडी अँगलला बाज विणण्याच्या सुती पट्ट्याने गळफास घेतला. यावेळी आवाज ऐकू आल्यामुळे त्यांच्या पत्नी व इतर नातेवाईकांनी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला असता आतून प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर शेजाऱ्यांनी दरवाजा तोडून पाहीले असता बालाजी चव्हाण यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या प्रकरणी आनंदराव चव्हाण यांनी दिलेल्या माहीतीवरून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास जमादार शेख बाबर हे करीत आहेत.

# शेतकरी कर्जमाफीसाठी आज धारफाटा येथे रास्तारोको आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ जुलै**



निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांच्या सातबारा कोरा करण्याच्या आश्वासनाची पूर्तता करा अन्यथा दि २४ जुलै रोजी धारफाटा येथे रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना सादर केलेल्या निवेदनात दिला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यातील शेतकरी, सध्या अत्यंत बिकट परिस्थितीतून जात आहे. नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊसमान, वाढलेले उत्पादन खर्च आणि शेतमालाला मिळणारा नगण्य भाव यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. विशेषतः मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे महत्त्वपूर्ण आश्वासन दिले होते. या आश्वासनामुळे शेतकऱ्यांमध्ये एक आशेचा किरण निर्माण झाला होता आणि त्यांना आर्थिक दिलासा मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र दुर्दैवाने अद्यापही हे आश्वासन पूर्ण झालेले नाही. कर्जामुळे अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्यास प्रवृत्त होत आहेत. सध्या शेतकरी हवालदिल झाला असून त्यांना मदतीची अत्यंत गरज आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाल्यास, शेतकऱ्यांना तातडीने मोठा दिलासा मिळेल. त्यांना नव्याने उभे राहण्याची संधी मिळेल आणि आत्महत्यांसारख्या दुर्दैवी घटनांना आळा बसेल. या निवेदनावर साहेबराव चव्हाण, विजय सांगळे विशाल सांगळे, रोहिदास चव्हाण, गणेश राठोड, परमेश्वर राठोड सुनील चव्हाण, बालाजी राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जालना महानगर पालिकेचा पहिला महापौर राष्ट्रवादी पक्षाचा व्यापारी वर्गातुन होणार -अब्दुल रशीद पहलवान

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

दिनांक २२ जुलाई २०२५ मंगळवारी रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जालना शहर महानगरची बैठक शहर जिल्हाध्यक्ष अब्दुल रशीद पहलवान यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करतांना अब्दुल रशीद पहलवान यांनी जालना महानगर पालिकेचा पहिला महापौर राष्ट्रवादी पक्षाचा राहणार असून तो व्यापारी वर्गातुन राहील असे प्रतिपादन केले.

यावेळी बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर हे होते. यावेळी मार्गदर्शन करतांना रवींद्र तौर म्हणाले येणाऱ्या काळात जालना महानगरपालिकेची निवडणूक होणार आहे जालना शहराचा विकासासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडणूकीत विजयी करावे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण सप्ताहात विविध सामाजिक उपक्रम राबवून



कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहत साजरा करावा. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अब्दुल रशीद पहलवान यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना सांगितले की येणाऱ्या काळात जालना महानगरपालिकेची निवडणूक लवकरच होणार आहे तरी राष्ट्रवादी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे कारण जालना शहराचा विकास फक्त राष्ट्रवादी कांग्रेस पक्षच करू शकते. राष्ट्रवादी पक्ष हा सर्व जाती धर्मांना घेऊ न चालणारा पक्ष आहे. जर युती झाल्यास ठीक नहीं तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार. महायुती झाली तरी जालना महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकल्या शिवाय राहणार नाही. जालना महानगरपालिके मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस सर्वात मजबूत पक्ष आहे पक्षाकडे आकर्षित होत आहेत. यासाठी सर्व प्रभाग मधुन अनेक इच्छुक उमेदवार आमच्या संपर्कात आहे अनेकांनी तिकिटासाठी मागणी केली आहे. लवकरच जालना महानगरपालिका निवडणूक संदर्भात राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची लवकरच भेट घेऊन सविस्तर चर्चा करणार जालना शहराची परिस्थिती व समीकरण याविषयी चर्चा करणार असून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जास्तीत जास्त नगरसेवक कसे निवडून येईल गणित मांडण्यात येईल. येणाऱ्या काळात जालना महानगरपालिकेवर राष्ट्रवादी पक्षाचा झेंडा फडकल्या शिवाय राहणार नाही असे संगीतले.

याबैठकीस वंदना खांडेभराड़ शितल बोराटे, सतीश पुरे, आकाश श्रीरामवर, ड. दिनेश दाने, आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी राहील मणियार, सत्तार पटेल, जफर बॉन्ड, शेख नईम, इमरान मणियार, खलील खान, सोहेल खान, आदींनी आपले विचार मांडले यावेळी सूत्रसंचालन व प्रस्ताविक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ओबीसी विभागाचे अब्दुल हफिस कुरेशी यांनी केले तर आभार सागर ठाकूर यांनी मानले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्व सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग क्रमांक २९ येथे सी.सी.ट्रीमिक्स रोडच्या आ.अर्जुनराव खोतकरांच्या हस्ते कामाचा शुभारंभ



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष योजने अंतर्गत जालना महानगर पालिका हद्दीतील प्रभाग क्र.२९ येथील टीवी सेंटर परिसरात सी.सी. ट्रिमिक्स रोड उद्घाटन सोहळा अंदाज समिती प्रमुख तथा आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाला उपस्थित सर्व नागरिकांशी आमदार अर्जुनरावजी खोतकर यांनी संवाद साधला व त्यांच्या विविध अडचणी जाणून घेत तात्काळ काही विषयांवर संबंधित अधिकाऱ्यांना फोन लावून लवकरात लवकर नागरिकांना होणाऱ्या अडचणींना सोडवावे असे आदेशित केले व जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता मी सदैव आपल्या सेवेत आपला भूमिपुत्र म्हणून तत्पर असल्याचं मत यावेळी व्यक्त केले.


टीव्ही सेंटर परिसरातील विविध विकास कामासंदर्भात उपस्थित नागरिकांनी यासंदर्भात ग्वाही दिली व आपण जो शब्द दिला होता तो पुरेपूर पाळलाय आणि आपल्या प्रभागातील झालेल्या विकास कामांना घेऊन उपस्थित लोकांनी आपला आनंद आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्याशी बोलताना व्यक्त केला.

याप्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, गणेश सुपारकर, लक्ष्मण नाना अवघड, मेघराज चौधरी, गोपी गोगडे, ज्ञानेश्वर सुपारकर, शिवसिंग तलवारवाले, प्रवीण जगताप, राऊत मामा, संतोष रासवे, ज्ञानेश्वर ढवळे, अनिल देशमुख, रामेश्वर गोरे, भगवान धिरडे, नारायण तारगे, पटेकर काका, सोपान काका, मुनरकर मदन देशमुख, अजय मापारी, आकाश गोरे, प्रमोद पवार, प्रवीण जगताप, रोहिणी टकले, संगीता देशमुख, शारदा गोरे, तसेच शिवसेना - युवासेना सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### संत शिरोमणी श्री सावतामाळी महाराज पुण्यतिथी साजरी

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी



मंठा शहरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरामध्ये संत शिरोमणी श्री सावता माळी महाराज पुण्यतिथी सोहळा विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी पोथी वाचन अभिषेक पूजन महाआरती व प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

मंठा शहरातील बोराडे गल्ली येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गावकऱ्यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यात पोथी वाचन , दिंडी सोहळा , काल्याचे किर्तन , भजन , कीर्तन , मंदिरातील संत शिरोमणी श्री सावता माळी महाराज यांच्या मूर्तीचा अभिषेक महापूजन व महाआरती संपन्न झाली. तसेच ह भ प श्याम महाराज नागठाणकर यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी परिसरातील भाविक भक्तांनी महाप्रसादासह धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला.

### देऊळझरी येथे २२९ रुग्णांची मोफत मोतीबिंदू व नेत्र तपासणी

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

वाढदिवसाचा गाजवाजा न करता.आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी आगळा वेगळा साजरा करावा या भावनेतून लायन्स क्लब ऑफ संभाजीनगर संचलित शिवसेना उपजिल्हाप्रमुख भुषण भैय्या शर्मा यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत मोतीबिंदू व नेत्र तपासणी शिबिर देऊळझरी येथे आयोजित केला होते. शिबिरामध्ये २२९ रुग्णांची मोतीबिंदू व नेत्र तपासणी करण्यात आली यावेळी देऊळझरीसह परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी उपजिल्हाप्रमुख भूषण शर्मा , तालुकाप्रमुख दत्ता बंगाळे , युवासेना तालुकाप्रमुख बालाजी पवार, किसानसेना तालुकाप्रमुख सुभाष भोपळे, गजानन भोपळे फिरोज भैया , विष्णु चव्हाण राजू परिहार , योगेश निकाळजे, साबीर पठाण,संतोष मंजुळे,सागर तुपे माजी सरपंच सुभाष भोपळे यानी कार्यक्रमांचे आयोजोन केले होते यांच्यासह देऊळझरी गावातील शाकीर शहा, पांडुरंग इंगळे, गणेश भोपळे, संतोष इंगळे, संतोष भोपळे, अमोल भोपळे, व शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.धनंजय दातार यांच्या तर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेली. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे. 'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगाव मध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ६ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ५ ते १० लिटर्स क्षमतेचे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर या उपकरणांचा समावेश होता. याआधी गेल्या वर्षीही ८ रुग्णांना श्री. दातार यांनी अशीच मदत केली आहे. याप्रसंगी बोलताना डॉ.धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आज ही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा म्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशा अभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढे ही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत. डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. 'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'चे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

# स्पर्धेच्या युगात तरुणांनी आपल्या क्षमता शोधुन शिक्षणात पुढे जावे -आ.संतोष दानवे

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मॉडेल करिअर सेंटर जालना व मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्या प्रसंगी उद्घाटक म्हणून समिती प्रमुख पंचायत राज समिती महाराष्ट्र राज्याचे भोकरदन जाफ्राबाद मतदार संघातील आमदार संतोष पाटील दानवे बोलत होते. ते म्हणाले की, भोकरदन जाफ्राबाद परिसरातील अनेक गुणवंत विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. परंतु तरीही पाहिजे तशी उत्तुंग झेप दिसत नाही. तरुण हे देशाची महाशक्ती असून आपल्या कौशल्याचा सकारात्मक वापर केल्यास कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात नैपूण्य मिळवून तरुणांना व्यक्तीमत्व विकास करता येईल. आजचे युग माहिती तंत्रज्ञानाबरोबर प्रचंड स्पर्धेचे असून त्यात आपला निभाव लागण्यासाठीच्या ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि आपल्या क्षमतांचा कस लावल्यास तरुणांना हवी ती क्षेत्रे पादाक्रांत करता येतील. म्हणून तरुणांनी आपल्या क्षमता शोधून आपला मार्ग निवडावा व चांगले शिक्षण घेऊन यशस्वी व्हावे. असे सांगितले. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे प्रास्ताविक जिल्हा कौशल्य विकास व रोजगाव उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त श्री. गणेश चिमणकर यांनी सांगितले, पुढे बोलताना ते म्हणाले की, सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आपला व्यवसाय, नोकरी निवडण्याची संधी निर्माण होत असते. आज या मेळाव्यात अप्रेन्टीस ट्रेनी साठीच्या ३५ पदांसाठी एल.



जी. बालकृष्णंन अँड ब्रॉस प्रा. लि. जालना ही कंपनी मुलाखती घेणार आहे. रिद्धी सिद्धी सर्विसेस प्रा. लि. जालना ही कंपनी टेली कॉलर, बँक ऑफीस. एम. आय. एस फिल्ड कलेक्शन ऑफीसर आणि एजेन्सी मॅनेजर या पदाच्या प्रत्येकी ३,२० आणि ३ जागांसाठी मुलाखती घेणार आहेत. अशा एकूण ३२७ जागांसाठी मुलाखती होत आहेत. यातून तरुणांना निश्चित रोजगार उपलब्ध होणार असून आपल्या क्षमतेनुसार क्षेत्र निवडण्याची संधी यातून निर्माण होणार आहे. मोरेश्वर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या रोजगार मेळाव्यातून जास्तीत जास्त बेरोजगार गरजू तरुणांना नोकरी रोजगार मिळणार आहे याचा आनंद वाटतो आहे. असे ते म्हणाले. या पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात एकूण २५९ विद्यार्थी उमेदवारांनी नोंदणी केली. त्यापैकी १४४ विद्यार्थी उमेदवारांनी वेगवेगळ्या पदासाठी मुलाखती दिल्या. यामध्ये १२१ विद्यार्थी व २३ विद्यार्थीनी होत्या. त्यातील ६७ विद्यार्थी व ८ विद्यार्थीनी अशा ७५ उमेदवारांची विविध आस्थापनेसाठी प्राथमिक निवड झाली. छत्रपती संभाजीनगर, जालना व भोकरदन येथील १२ कंपन्यांचे नियोक्ते उपस्थित होते. या रोजगार मेळाव्यात शासनाच्या जिल्हास्थरावरील विविध महामंडळे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रसंगी स्वयंरोजगाराबाबत अर्थसहाय्य करणाऱ्या विविध शासकीय महामंडळांचे स्टॉल लावण्यात आलेले होते. यामध्ये शासनाच्या विविध योजनाबाबत माहिती देण्यात आली. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजने अंतर्गत ८ लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वितरण माजी केंद्रिय रेल्वे राज्यमंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे व भोकरदन जाफ्राबाद विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. भगवान गिरणारे यांनी मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या अभूतपूर्व योगदानांचा आढावा आपल्या वाचनातून घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान डोंगरे यांनी आभार प्रदर्शन केले. तर रोजगार मेळाव्याचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गोवर्धन मुळक यांनी केले. या रोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी श्री. भुजंग रिठे, श्री. अमोल बोरकर, श्री. आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, श्री. प्रदिप डोळे, श्री. रवी पाडमुख, श्री. विशाल जागरवाल, श्री. उमेश कोल्हे, श्री. दिनेश उढाण, श्री. सोमेश्वर शिंदे, श्री. अमर तुपे, श्री. दीपक पालवे, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ७५ उमेदवारांची निवड



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जालना अणि मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन जि. जालना यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार दि २२ जुलै, २०२५ रोजी मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन जि. जालना येथे पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न झाला. या रोजगार मेळाव्यात एकुण २५९ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४४ उमेदवार प्रत्यक्ष मुलाखतीस सहभागी झाले होते. यामध्ये १२१ पुरुष तर २३ महिलांचा समावेश आहे. या रोजगार मेळाव्यात परीसरातील एकुण ७५ उमेदवारांची विविध पदांसाठी आस्थापनांव्दारे प्राथमिक निवड करण्यात आली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर व जालना येथील एकुण १२ नियोक्ते उपस्थित होते यामध्ये ६७ पुरुष व ८ महिला असे एकुण ७५ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली. तसेच या मेळाव्यात शासनाच्या जिल्हास्तरावरील विविध महामंडळे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते अण्णासाहेब पाटील अर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत ८ लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोकरदन विधानसभा सदस्य आ. संतोष दानवे उपस्थित होते. यावेळी मंचावर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर, भुजंग रिठे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास परीसरातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी केले. या रोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी अमोल बोरकर, आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, प्रदीप डोळे, रवि पाडमुख, विशाल जगरवाल, उमेश कोल्हे, दिनेश उढाण, सोमेश्वर शिंदे, अमर तुपे, दिपक पालवे यांनी परीश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमास मोरेश्वर महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. गोवर्धन मुळक यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. भगवान डोंगरे यांनी केले.

# काल पडलेल्या पावसाने पिके वाहुन गेली; शेतकऱ्याकडून पंचनाम्याची मागणी

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी



तालुक्यातील जामखेड मंडळातील चिंचखेड, राहुवाडी, झोडेगाव येथे अतिवृष्टी प्रमाणे पाऊस पडल्याने जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. पडलेल्या पावसात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके वाहुन गेले असुन तहसीलदार यांनी तातडीने पंचनाम्याची मागणी जोर धरीत आहे. पर्जन्यमान यंत्र जामखेड गावात बसवलेले असुन पर्जन्यमान यंत्र असलेल्या ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी आहे मात्र इतर ठिकाणी अतिवृष्टी झालेली पहायला मिळते.

चिचंखेड येथील शेतकरी चंद्रशेखर मोहरीर यांच्या शेतातील सोयाबीन तर बाबासाहेब गोल्टे यांच्या शेतातील तुरीचे पीक वाहून गेले आहे.चिचंखेड गावातील अण्णाभाऊ पैठणे, आनंद पैठणे, संभाजी गोल्डे, गजानन मोहरीर,संतोष जिरेकर,महेश पैठणे,बप्पा शिंगाडे,नारायण शिंगाडे,बाळू मगरे,भगवान मुळे,कैलास काळे,प्रशांत पैठणे,सचिन जोशी,परसराम खरे आदी शेतकऱ्यांचे नुकसान झाले असुन झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना शेतकऱ्यांच्या बांदावर तहसीलदार यांनी पाठवण्याची मागणी जोर धरीत आहे.

# पाणंद रस्त्याचे काम प्रगतिपथावर

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध येथे पांदण रस्ते पुरातत्वाकडे भोकरदन जाफ्राबाद मतदारसंघाचे आमदार संतोष पाटील दानवे यांनी पारध येते विजय सभेमध्ये शब्द दिला होता की लवकरच पारध येथे पांदन रस्त्यांना पहिले प्राधान्य देणार व शब्द तो आज आमदार साहेबांनी पूर्ण केला, गेल्या काही वर्षांपासून पादण रस्ते नसल्यामुळे पारध येतील शेतकऱ्यांना शेतात जाण्या येण्यासाठी रस्ता नसल्यामुळे जनावरांना,स्वतःच्या मालासाठी व शेतकरी पारध परिसरात पाणी जास्त असल्यामुळे भाजीपाल्याची लागवड व मिरची लागवड करतात त्यामुळे शेतातून पीक बाहेर काढताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागते पण आज पारध येतील ऋषी बाबा मंदिर ते अवघडराव सांगवी शाळेपर्यंत पांदण रस्ता झाल्यामुळे शेतकऱ्यांचे पुन्हा चांगले दिवस येतील. त्यामध्ये पारध परिसरात पूर्ण नऊ किलोमीटर पेक्षा जास्त रस्ता पूर्ण होणार



आहे,यामध्ये आज एक किलोमीटर पांदण रस्ता पूर्ण झाला.यामध्ये माजी. सभापती परमेश्वर पाटील लोखंडे, माजी. सरपंच गणेश पाटील लोखंडे, अशोक लोखंडे, पंचायत समिती गणेश लोखंडे, शिवा लोखंडे,संजय पा लोखंडे, पवन लोखंडे,भानुदास लोखंडे, विठ्ठल लोखंडे,देविदास तेलंग्रे,साहेबराव तेलंग्रे,भगवान तेलंग्रे,अविनाश देशमुख,फैयाज खान,संतोष लोखंडे,ज्ञानेश्वर बोराडे,लक्ष्मण लोखंडे,सांडू सपकाळ,साहेबराव सुरडकर, पांडुरंग लोखंडे या शेतकऱ्यांनी आमदार संतोष पाटील दानवे यांचे आभार व्यक्त केले.

# शेतकऱ्याच्या मृत्यूने हादरले परतूर; पारदर्शक तपास आणि कठोर कारवाईचे आ.बबनराव लोणीकरांचे आदेश

तभा वृत्तसेवा
प्रतिनिधी/परतूर

परतूर तालुक्यातील शेतकरी संदीप भालेकर यांच्या शेतात महावितरणच्या निष्काळजीपणामुळे विजेच्या अस्ताव्यस्त तारांमुळे शॉक लागून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात खळबळ माजली असून, महावितरणच्या गलथान कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शेतकऱ्यांनी यापूर्वी वीजतारांच्या दुरवस्थेबाबत महावितरणच्या कर्मचाऱ्यांना वारंवार माहिती दिली होती, परंतु कोणतीही दखल घेतली गेली नाही, ज्यामुळे ही दुखद घटना घडली.

या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने पावले उचलली. त्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. मठपती यांच्याशी संपर्क साधून या प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ



निलंबित करण्याची मागणी केली. तसेच, भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी वीजतारांची नियमित तपासणी आणि देखभाल यंत्रणा मजबूत करण्याचे निर्देश दिले. लोणीकर यांनी भालेकर कुटुंबाला तात्काळ आर्थिक नुकसानभरपाई आणि आवश्यक आधार देण्याची मागणीही केली होती. आज, दिनांक २३ जुलै २०२५ रोजी, बुधवारी, आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर येथील भालेकर कुटुंबाच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. या भेटीत त्यांनी कुटुंबाच्या दुखात सहभागी होताना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले. या दुखद प्रसंगी कुटुंबाला आधार देण्यासाठी त्यांनी तात्काळ प्रशासकीय पावले उचलली. भेटीदरम्यान, लोणीकर यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांशी फोनवर संपर्क साधून भालेकर कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या. तसेच, या प्रकरणात दोषी असलेल्या महावितरणच्या उपअभियंत्याला तात्काळ निलंबित करण्याचे आश्वासन दिले. यामुळे दोषींवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. याशिवाय, लोणीकर यांनी उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे यांच्याशी संपर्क साधून भालेकर कुटुंबाला स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेचा लाभ तातडीने मिळवून देण्याचे निर्देश दिले. या योजनेच्या माध्यमातून कुटुंबाला आर्थिक आधार मिळण्यास मदत होईल. आमदार बबनराव लोणीकर यांनी या घटनेची गंभीर दखल घेताना महावितरणच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ही अत्यंत दुखद आणि गंभीर घटना आहे. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे एका शेतकऱ्याचा बळी गेला आहे. दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी यापुढे अशा दुर्घटना टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे. त्यांनी या प्रकरणाचा पारदर्शक तपास होऊन दोषींवर कठोर कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली. ही घटना महावितरणच्या कार्यप्रणालीतील त्रुटी आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेकडे होणारे दुर्लक्ष अधोरेखित करते. ग्रामीण भागात वीजतारांची दुरवस्था आणि देखभालीचा अभाव यामुळे शेतकऱ्यांचा जीव धोक्यात येत आहे. लोणीकर यांनी यंत्रणांना शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आणि वीजतारांची नियमित तपासणी करून देखभाल यंत्रणा सक्षम करण्याचे आवाहन केले आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे भालेकर कुटुंबाला आर्थिक आणि भावनिक आधार मिळण्यास मदत होत आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे दोषींवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला असून, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक सतर्क होण्याची अपेक्षा आहे. भालेकर कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी लोणीकर यांचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रसंगी विश्वजीत दादा खरात, भाजपा परतूर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे तालुका संघटन सरचिटणीस सावता काळे, तालुका उपाध्यक्ष ड सुरेश काळे,शहर अध्यक्ष प्रवीण सातोनकर, नगरसेवक प्रकाश चव्हाण,संभाजी घनवट, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अर्जुन जगताप,नामदेव गोरे, सतीश सोनवणे यांच्या सह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### चूडावा-मरसुळ रेल्वे बायपासला शेतकऱ्यांसह पूर्णेकरांचा तीव्र विरोध

तहसीलसमोर शेतकऱ्यांचे साखळी उपोषण....



**पूर्णा,/प्रतिनिधी-** तालुक्यातील चुडावा-मरसूळ रेल्वे बायपास प्रकल्पाला शेतकरी व स्थानिक नागरिकांनी जोरदार विरोध दर्शविला आहे. आडगाव लासिना, बरबडी, गौर या गावांच्या शेती पट्यातून बायपास प्रस्तावित असल्याने उपजिविकेचा आधार असलेल्या शेतीवर गदा येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जमीन मोजणी थांबवून प्रशासनाला चांगलाच दणका दिला आहे.

शेतकर्यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन २१ जुलैपासून तहसील कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. प्रस्तावित बायपास त्यांच्या शेतीच्या मुख्य पट्ट्यातून जात असून ती जमीन गेल्यास जगण्याचे साधनच नाहीसे होईल. शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्याचा प्रयत्न होत असल्याने या बायपासला कोणत्याही परिस्थितीत परवानगी देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनात विठ्ठल भोरे, कैलास ठाकरे, भाऊराव सोनवळे, मुंजाजी सोनवळे, बळीराम गौंड, यादवराव जाधव, पंचफुलाबाई भोरे, नवनाथ दवणे, चांदू पारवे, राजकुमार जोगदंड यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते प्रदिप नन्नवरे आदी शेतकरी, ग्रामस्थ सहभागी झाले.शिवाय अनेक राजकीय पक्षांनी या बायपासला विरोध दर्शवत शेतकऱ्यांना उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दिला आहे.

### लोकमान्य टिळकांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने आदरांजली



**परभणी,/प्रतिनिधी -** अखिल भारतीय ग्राहक पंचायत सेलू शाखेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जयंतीनिमित्त बुधवारी दिनांक २३ जुलै रोजी आदरांजली वाहण्यात आली. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्ताने शहरातील बाबासाहेब मंदिर रोडवरील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत देवगिरी प्रांताध्यक्ष डॉ, विलास मोरे, निवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ वाघमारे, सेलू तालुका अध्यक्ष सतीश जाधव, उपाध्यक्ष गंगाधर कान्हेकर, सचिव मंजुषा कुलकर्णी, परभणी जिल्हा सहसचिव सुनील गायकवाड, सुकाचार्य शिंदे, विनायक जोशी, राजेश कुलकर्णी, गजानन नावडकर, आकाश जाधव आदींची उपस्थिती होती.

### भाजपाच्या धनगर टाकळी येथील रक्तदान शिबीरास जोरदार

प्रतिसाद : मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्ताने मंगळवारी (दि.२२) पूर्णा ग्रामीण मंडळाच्या वतीने धनगर टाकळीत आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरास जोरदार प्रतिसाद मिळाला.

भारतीय जनता पार्टीतर्फे सेवा सप्ताहाचे औचित्य साधून गोमातेचे पूजन, मागावर्गीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप तसेच वृक्षारोपणाचाही उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, प्रदेश कार्यकारणी सदस्य रामकिसन रौंदळे, ग्रामीण मंडळाध्यक्ष संजय मोहिते, ऋषिकेश सकनूर, बळीराम कदम, राम चापके, अनंतराव पारवे, व्यंकटराव देसाई, बालाजी रोडगे, मारोती साखरे तसेच पूर्णा ग्रामीण मंडळाचे अन्य कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिक्षण संस्थाचालकांच्या प्रश्नांवर सकारात्मक विचार करु

शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रतापसिंह यांची ग्वाही : महामंडळाच्या शिष्टमंडळाची भेट

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षण संस्था चालकांच्या विविध मागण्यांसंदर्भात निश्चितच सकारात्मक विचार विनिमय केला जाईल, अशी ग्वाही राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांनी दिली.

राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने सोमवारी पुण्यात शिक्षण आयुक्तांच्या कार्यालयात शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांची भेट घेतली. यावेळी शिक्षण संस्था महामंडळाचे कार्याध्यक्ष विजय नवल पाटील, गणपतराव बालवडकर, रामकिसन रौंदळ, वाल्मिक सुरासे, मनोज पाटील, अजित वडगांवकर हे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# निराधार योजनेचा दलालांना आधार

## सर्रासपणे घेतली जाते टक्केवारी,दलालांना आवर घालणे गरजेचे

**शिवाजी आकात**

**सेलू/प्रतिनिधी-** तालूक्यात संजय गांधी निराधार,वृद्धपकाळ,विधवा परितक्ता ,दिव्यांग योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दिल्या जात असलेल्या पगारीतून दलाल आपली उपजिवीका भागवत असल्याने या निराधार योजनेचा लाभार्थ्यांऐवजी दलालांना आधार होत असल्याचे चित्र तालूक्यात दिसत आहे. शासनाकडून पात्र लाभार्थ्यांना दरमहा १हजार ५०० रूपये आर्थीक मदत दिली जाते. दरम्यान या आर्थीक मदतीत दलाल भागीदार होत आहेत.



जेव्हा लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होतात तेव्हा हे दलाल संबधित लाभार्थ्यांना एकत्र बँकेत आणतात व लाभार्थ्यांना बँकेत रांगेत लावून हे महाशय बँकेच्या आवारात बस्तान मांडून असतात. लाभार्थ्यांना पैसे मिळाले की,हे दलाल त्यांची टक्केवारी चे पैसे काढून घेवून उर्वरित रक्कम लाभार्थ्यांना देत आहेत .सदरिल दलालांची टक्केवारी ठरलेली असते नविन पहिली पगार झाली की,त्यातून ५० टक्के रक्कम किंवा ७५ टक्के रक्कम लाभार्थ्याकडून घेतली जाते. तसेच लाभार्थी जिवंत असे पर्यंत दर पगार ५०० ते १हजार रूपये दलाल वसूल करतात नसता लाभ बंद करण्याची धमकी दलाल लाभार्थ्यांना देतात.पगार बंद होईल या भितीने लाभार्थी विनाकारण या दलालांना पोसत असल्याचे चित्र सध्या तालूक्यात सूरू आहे.हे दलाल एवढ्यावरच न थांबता या गोरगरीब लाभार्थ्यांचे आधारकार्ड व बँकेचे खातेबूक स्व:त कडे ठेवून घेतात ज्यावेळेस अनूदान रक्कम बँक खात्यात जमा झाली की हे दलाल लाभार्थ्यांना बँकेत घेवून जावून त्यांची अनूदान रक्कम उचलून घेत आहे. शासनाच्या निधीचा दलालाकडून होत असलेला काळाबाजार थांबविणे गरजेचे असल्याचे मत लाभार्थ्यातून होत आहे. दलालांवर कारवाही होणे गरजेचे शासन श्रावणबाळ वृद्धापकाळ,संजय गांधी निराधार,दिव्यांग योजनेतून पात्र लाभार्थ्यांना दरमहा १हजार ५०० रूपये दिले जातात.सदरिल योजनेची रक्कम डिबिटी व्दारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते परंतू लाभार्थ्यांची अनूदान रक्कम जमा झाली की, दलाल लाभार्थ्यांना बँकेत घेवू येतात व अनूदान रक्कम बँकेतून काढून घेत त्यांची ठरलेली टक्केवारी वसूल करतात व बँकेचे खातेपूस्तक व आधारकार्ड हे दलाल जमा करून स्व:त कडे ठेवतात शहरात असे भरपूर दलाल कार्यरत आहेत त्यांचा बंदोबस्त होणे गरजेचे आहे तसेच या दलालांवर योग्य कारवाही होणे गरजेचे आहे.



### स्वराज्याचे श्रद्धास्थान - लोकमान्य टिळक जयंती एकलव्य मध्ये साजरी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!'' या ओजस्वी घोषणेतून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला दिशा देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती एकलव्य बाल विद्या मंदिर माध्यमिक शाळा, जिंतूर येथे मोठ्या उत्साहात, सन्मानपूर्वक व साहित्यिक वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात टिळकांच्या प्रतिमेवर पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. वातावरणात टिळकांच्या विचारांचा स्फुल्लिंग निर्माण झाला. मुख्याध्यापक एस. पी. गीते यांनी टिळकांच्या व्यासंगी, तत्वनिष्ठ आणि निर्भीड स्वभावावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, ''टिळक हे केवळ व्यक्तिमत्त्व नव्हते, ते एक ज्वालामुखी होते विचारांचा, परिवर्तनाचा आणि स्वाभिमानाचा!''कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी टिळकांच्या जीवनमूल्यांचा स्वीकार करण्याचा संकल्प करत कार्यक्रमाचा समारोप केला. या साहित्यिक, सांस्कृतिक आणि वैचारिक वातावरणाने शाळा एक प्रकारच्या देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली.

### परभणी पावसाने दिली उघडदीप

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरात पावसाने गेल्या दोन ते तीन दिवसापासून उघडदीप दिली आहे. त्यामुळे शेतकरी तसेच सामान्य नागरिक यामुळे परेशान झालेला दिसत आहेत. सध्या पावसाची मोठी आवश्यकता आहे. त्यातच यावर्षी पावसाने उशिरा आपली हजेरी लावली होती. तसेच मे महिना पूर्ण पावसाने आपले आगमन केले होते. त्यानंतर मात्र पावसाने चांगलीच उघडदीप दिली यामुळे सर्व वातावरणात कमालीचा उकाडा निर्माण झाला होता. त्याचा परिणाम यावर्षी पावसावर झाला आहे.

## वडगाव स्टेशनला पर्यावरण रक्षणासाठी वृक्ष लागवड मोहिम

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील जि.प. कें. प्रा. शाळा वडगाव स्टेशन व ग्रामपंचायत कार्यालय वडगाव स्टेशन येथे मंगळवार दिनांक २२ रोजी विविध झाडांची वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी लावलेल्या वृक्षांच्या पुढील देखभालीची जबाबदारी अनेकांना देण्यात आली.

दिवसेंदिवस पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास हा मानवी जीवनाचा धोका बनत चालला आहे. यासाठी पर्यावरण रक्षणासाठी विविध वृक्षांच्या लागवडीसाठी प्रत्येकाने पुढे येण्याची गरज आहे. सध्या सर्वत्र फोटोसेशन करून वृक्ष लागवडीचा नुसता देखावा



करत आहेत.परंतू लावलेले वृक्ष हे जगले पाहिजेत त्यासाठी त्याचे संगोपन महत्वाचे आहे. यावेळी वडगांव येथे वृक्ष लागवड करुन त्यांच्या संगोपनाची जबाबदारी नागरीकांनी घेतली.

या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. सखुबाई बचाटे, सरपंच भागवतराव बांगे, ग्रामसेवक केदार शिंदे,वैद्यकीय अधिकारी श्रीमती धोंडगे व आरोग्य विभागाचा सर्व स्टाफ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मारुती तिडके, राजू सगरे,श्रीधर सावंत, चंद्रकांत कदम , सुरेखा ढेले, कुंडलिक कांबळे, व विद्यार्थी विद्यार्थिनी,सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर बचाटे यांची उपस्थिती होती. यावेळी बकुळ, फणस, रबर,कदंब,कडुनिंब इत्यादी ५० प्रकारच्या वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली.

### मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त ५५ वृक्षांचे वृक्षारोपण

जिंतूर- महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त कुठेही बॅनरबाजी न करता, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ रवींद्र चव्हाण साहेब यांच्या संकल्पनेतून महा रक्तदान शिबिर व मा. नामदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिंतूर शेलू विधानसभेतील जिंतूर मंडळामध्ये सकाळी गोमाता पूजन ,श्रीमती कस्तुरबा गांधी विद्यालयात ५५ वर्षाचे वृक्षरोपण व नंतर जिंतूर आयसीयू जिंतूर येथे महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमास ह भ प संदीप महाराज शर्मा, जिंतूर सेलू विधानसभा प्रमुख डॉ. पंडित दराडे मा.नगराध्यक्ष सचिन गोरे मा.नगराध्यक्ष प्रताप भैया देशमुख जिंतूर मंडळाचे अध्यक्ष विलास भंडारे, भाजपा तालुकाध्यक्ष गोविंद थिटे, मंडळ महामंत्री ॲड अशोक बहिरट, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष गणेश कुरे, शिवाजीराव कदम, प्रदीप जाधव, बालाजी पोरवाल, विजय जाधव, शैलेश कोठेकर, गुज्जर मोहिते, राजेश राठोड, रमेश अण्णा संगेकर, महिला मोर्चाचे अध्यक्ष वैष्णवी कुलकर्णी, अशोक बुधवंत, माधव दराडे, नगरसेवक रहमान भाई, अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष फिरोज भाई, मा. नगरसेवक अब्दुल मुखिद, सुमेध सूर्यवंशी, उमेश दराडे, मुक्तेश भंडारे, एड गोपाळ रोकडे, ह भ प टाक महाराज, शाळेतील शिक्षक वृंद विद्यार्थिनी , भाजपा पदाधिकारी व रक्तदाते उपस्थित होते.



**जिंतूर- वरुड येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले वरुड ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत कार्यालय शाळा व अंगणवाडी परिसरामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या उचिते साधून वृक्षारोपण करण्यात आली यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र भाऊ थिटे आदी दिसत आहेत.**

## चारठाणा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न

**चारठाणा,/प्रतिनिधी:** चारठाणा येथे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबीर महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपा महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श साधण्यात आला आहे.

याअंतर्गत संपूर्ण राज्यभरात मंडल स्तरावर भाजपाच्या वतीने महारक्तदान शिबीर उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भारतीय जनता पार्टी चारठाणा मंडळामध्ये राज्यमंत्री तथा पालकमंत्री मा.ना.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर, मा.आ.रामप्रसादजी बोर्डीकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली तसेच मंडळ अध्यक्ष गोविंद थिटे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर व वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी रक्तदान करत देवाभाऊंना वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्याबद्दल सर्व रक्तदात्यांचे आभार मानले, तसेच त्यांना



प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. भारतीय जनता पार्टी मार्फत चारठाणा मंडळामध्ये राबविण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये जवळपास १०७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. संकलित केलेल्या रक्त पिशव्या शासकीय रक्तपेढीचे डॉ.संकेत वाघ यांच्या कडे सुपूर्द करण्यात आले. रक्त संकलित करण्यासाठी डॉ.संकेत वाघ, डॉ.जठाळ आत्माराम, संदीप देशमुख, सय्यद एजाज, वाघमारे, शेख सलीम, डॉ. मंगेश बल्लाळ, विजय ढाकणे, आरोग्य सहयिका श्रीमती सुनंदा पवार, सोमनाथ खके, ज्ञानेश्वर हत्तेकर, सोनाली काळबांडे, दीपमाळा पाटेकर, वैजेनाथ मुंजे यांच्या टीमने सहकार्य केले. याप्रसंगी भाजपा मंडळ अध्यक्ष गोविंद थिटे पाटील, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, इंद्रजित घाटुळ, डॉ.राजेश पोकर्णा, डॉ.मंगेश बल्लाळ, शासकीय रक्तपेढीचे डॉ.संकेत वाघ, डॉ.आत्माराम जठाळ, डॉ.अझर काझी, मा. जी.प. सदस्य भगवान दादा वटाणे, सरपंच रमेश गिते, सरपंच रमेश सडाळ, राजेभाऊ शिंदे सोसकर, सरपंच अनिल वांढेकर, गजानन चव्हाण, (कवडा) भास्कर थिटे, अशोक बुधवंत, ज्ञानेश्वर मते, सचिन आढे, अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, ग्राम पंचायत सदस्य दौलतराव देशमुख, सुभाष पवार,बाळु तमशेटे, गणेश पारवे, सय्यद खलील, भारत खाडे, पुरुषोत्तम भाऊ चव्हाण, शिवाजी दादा चव्हाण, तातेराव चव्हाण, रामेश्वर देशमुख, दिनकर देशमुख, नामदेव चव्हाण, रामेश्वर चव्हाण, राहुल चव्हाण, दिपक भाग्यवंत,हनुमान मेहेत्रे, प्रकाश मेहेत्रे, सतीश देशमुख, संदीप देशमुख, जगदीश देशमुख, श्याम देशमुख, रुस्तम अप्पा देशमुख, बाळासाहेब देशमुख, श्रीपाद देशपांडे, अण्णासाहेब मुळे, गणेश राऊत, अथर काझी, प्रभाकर कुऱ्हे, ज्ञानेश्वर खाडे, गणेश खाडे, विशाल निकाळजे, किरण निकाळजे, अमोल भवरे, कृष्णा सोनटक्के, सूर्यकांत निकाळजे, निवा राठोड, पुनम तमशेटे, शिवकन्या मते, यांच्यासह अनेक भाजपा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# एक हात कानाच्या मोबाईला तर दुसरा स्टेअरिंगवर

## तुफान वेगाने विना नंबर वाहानातून मुरुम व रेतीची वाहतूक

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२३ जुलै -**

गोदावरी काठाच्या गावातून हजारो ब्रास अवैध वाळू उपसा केला जातो. ग्रामीण रुग्णालय व आय.टी.आय परिसरातुन दरोरोज मुरमाची वाहातुक होते.शासनाचा महसूल बुडवून मुरुम,वाळू चोरटे विना नंबरच्या हायवा टिपर वाहानातुन सकाळी आणि रात्रीला मोठ्या प्रमाणात विना नंबर वाहानातून मुरमाची,रेतीची वाहातुक केली जाते ,समोरील खबऱ्याचे लोकेशन घेण्यासाठी अवैध रेती हायवा चालकाचा एक हात मोबाईल कानाला लावून तर दुसरा हात स्टेअंरिगवर ठेवून तुफान वेगात विना नंबर हायवा टिपरची वहातुक केली जाते. पोलिस व महसूल प्रशासनाच्या समोरुन तुफान वेगात रेती व मुरुंमाची वाहातुक होते याकडे यत्रंना बघ्याची का भूमिका घेते मग हि यत्रंना कशात बरबटली म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.रस्त्या लगत पोलिस स्टेशन असताना अति वेगात जाणाऱ्या वाहनांकडे पोलिस स्टेशन व अवैध रेती महसुल पथक, महसूल मंडळाधिकारी, तलाठी



जाणून बुजून दुर्लक्ष करताना दिसुन येतात ,रस्त्यावर लावलेली सि.सि.टिव्ही यत्रंना , महसूल पथक, महसूल कर्मचारी कोणाच्या आदेशाने कोणते कृर्तत्वे बजावतात म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

शहरातील ग्रामीण रुग्णालय व आय.टी.आय.परिसरातुन दररोज मुरुमाची वाहातुक होते याची कल्पना पोलिस व महसूल यत्रंनेला माहिती असताना याकडे कानाडोळा केला जातो. गोदाकाठावरील बेटसांगवी, शेवडी, पेनुर, भारसवाडा, अंतेश्वर, चित्रा वाडीसह सीमा भागावरील गावातून रात्री चोरट्या मार्गाने हजारो ब्रास रेती उपसा केला जातो. याकडे पोलिस स्टेशन,मंडळ, महसूल अधिकाऱ्याची यंत्रना छुपा पाठिंबा देत असल्याचे वेळोवेळी दिसून येत आहे.

शहरातून रात्री रेती हायवा टिपरची वाहतूक होत असताना पोलिस प्रशासन बघ्याची भुमिका का घेते हा मोठा प्रशन आहे. वाळूने भरलेले हायवा टिप्पर दररोज रात्री व सकाळी रात्रभर पोलिस स्टेशनच्या समोरून लातूर जिल्ह्याकडे वाहतूक होत असते याकडे दुर्लक्ष का केले जाते. यावर पोलिस प्रशासन कोणतीही कारवाई करण्यास का धजावत नाही. या प्रकारामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अवैध वाळू, अवैध मुरंम वाहतुकीकडे पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी लक्ष देऊन शहरातील वाळू वाहतूक बंद करावी अशी मागणी जनतेने केली आहे.

# उपाध्यक्षपदाच्या निवडीनंतर हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचे कॉंग्रेस कडून जंगी स्वागत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२३ जुलै -**



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी माजी आमदार तथा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर खा. रविंद्र चव्हाण यांच्या विशेष उपस्थितीत, जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरातील पक्ष कार्यालय येथे हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचे जोरदार जंगी स्वागत करण्यात आले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध झाली व माजी आ.तथा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांची उपाध्यक्ष पदी निवड झाली. या निवडीनंतर जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचे जोरदार जंगी स्वागत करण्यात आले. शहरातील पक्ष कार्यालयापुढे जोरदार अतिषबाजी करण्यात आली. यावेळी खा.रविंद्र चव्हाण, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, प्रदेश सचिव सुरेंद्र घोडजकर, सरचिटणीस राजेश पावडे, श्याम दरक, दिलीप पाटील बेटमोगरेकर, अनिल मोरे, संजय बेळगे, श्रीनिवास मोरे, आनंद चव्हाण, संजय भोसीकर, महेश देशमुख तरोडेकर, बालाजी चव्हाण, गंगाधर सोंडारे, प्रफुल्ल सावंत, गंगाधर सोनकांबळे, डॉ. रेखा चव्हाण, डॉ.करुणा जमदाडे, नशिम पठाण, सतिश देशमुख तरोडेकर, बापूसाहेब पाटील, माधवराव पवळे, गणेश ठगे, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, रावराव पाटील बेटमोगरेकर, निरंजन पावडे, महेश शिंदे, दिपकसिंग हजूरिया, संजय वाघमारे, गगन यादव, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, अंबादास रातोळे, गणेश पाटील, गोविंद पाटील, शेख मुख्तार, नागराज सुलगेकर, शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख बबन बारसे, महेश खेडकर, सुनील शिंदे, धनंजय उमरीकर, तुषार पोहरे, आदीसह बहुसंख्य पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### सोनखेड येथील हनुमान मंदिरातील दान पेटीवर चोरट्याचा डल्ला

**सोनखेड-** येथील बाजार मैदानात व सोनखेड पोलीस ठाण्यासमोर असलेले दक्षिण मुखी हनुमान मंदिरात असलेली दानपेटी सोमवारी रात्री अंदाजे दोन च्या सुमारास अज्ञात चोरट्याने मंदिराचे गेट चे कुलूप तोडून आत प्रवेश करून दान पेटी फोडली व आतील अंदाजे तिस ते चाळीस हजार रुपये लंपास केले सदरील घटना मंदिरातील सीसी टिव्ही कॅमेरा मध्ये कैद झाली असून घटनेची माहिती सोनखेड पोलीस ठाण्याला देऊन शंकर नामदेवराव मोरे यांच्या फिर्यादी वरून सोनखेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे सोनखेड ठाण्या समोरच चोरी झाली असल्यामुळे पोलिसांच्या रात्रीच्या गस्ती विषयी प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.



### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**इस्लापूर-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान संकल्प समाज उपयोगी अभियान भाजपाच्या वतीने जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबविले जात असताना किनवटचे आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली इस्लापूर येथील साई मंगल कार्यालयात रक्तदान शिबिर राबवण्यात आले. भाजपा किनवट तालुका दक्षिण विभागाचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन साई मंगल कार्यालय इस्लापूर येथे केले असता या रक्तदान शिबिराला भाजपाचे ओबीसी चे जिल्हाध्यक्ष व माजी विधानसभा प्रमुख बाबुराव केंद्रे. पंचायत समितीचे उपसभापती कपिल करेवाड, भाजपा अनुसूचित जमाती आदिवासी सेलचे अध्यक्ष गोविंद अंकुरवाड,भाजपा युवा जिल्हा सरचिटणीस स्वप्निल गरडे, भाजपाचे श्रीरंग पवार, भाजपा अनुसूचित जातीचे जिल्हा सरचिटणीस रवी कसबे, जिल्हा उपाध्यक्ष विवेक केंद्रे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सूर्यनारायण पाटील, तालुका सरचिटणीस श्रीहरी मुंडे, रमेश बोडेवाड, सतीश सोंडारे,संदीप वानखेडे पाटील, बालाजी काळे, गजानन कदम, शेख लतीफ, संग्राम बिरलकुले, विकास माहुरकर, गजानन मोहिते, गोविंद भदेवाड, सुरज लासीनकर, बालाजी पळसपुरे. प्रवीण माहुरकर हे उपस्थित होते, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली. या रक्तदान शिबिरामध्ये अनेक भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व तरुणांनी सहभाग घेत रक्तदान केले या रक्तदान शिबिरामध्ये जवळपास ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले असून ही रक्तदान प्रक्रिया नांदेडच्या नंदिग्राम ब्लड बँक ग्रुपने ही रक्तदान प्रक्रिया पार पाडली. इस्लापूर येथे रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती भाजपा किनवट दक्षिण विभागाचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांनीही माहिती दिली.



### स्वारातीम' विद्यापीठामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी

**नवीन नांदेड-** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.२३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड, उपकुलसचिव व्यंकट रामतीर्थे, सहा. कुलसचिव डॉ. सरिता लोसरवार, स्वीय सहाय्यक लक्ष्मीकांत आगलावे, अधीक्षक के. डी. पाटील, सिस्टीम एक्सपर्ट लीना कांबळे यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



### निवघा बा येथे रक्तदान शिबिर

**निवघा बा.-** हदगाव पश्चिम मंडळ येथे भारतीय जनता पार्टी च्या वतीने दि २२ रोजी निवघा बा ता हदगाव जिल्हा नांदेड उत्तर येथ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांच्या वाढदिवसानिमित्त निवघा बाजार ता हदगाव जिल्हा नांदेड उत्तर येथे महा रक्तदान शिबिराचे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भा ज पा महाराष्ट्र प्रदेश सदस्य चंद्रशेखर पाटील कोळीकर, जेष्ठ नेते तुकाराम चव्हाण साहेब, निवघा से सह सोसायटी चे चेअरमन बाळासाहेब कदम व पश्चिम मंडळ अध्यक्ष सुर्यकांत हनवते यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी गोलु पाटील अध्यक्ष युवा मोर्चा, उपाध्यक्ष बाळू देशमुख सुधाकर तावडे भास्कर देशमुख देवानंद महाजन सुधाकर शिंदे प्रदीप राव देशमुख विजय देशमुख प्रभाग देशमुख गजानन निलेवार कृष्णा मुळगावकर उपस्थित होते.

# दापका जिल्हा परिषद गट कायम ठेवा : कलंबरकर

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि.२३ जुलै -**

नवीन जिल्हा परिषद प्रारूप मसुद्यामध्ये मुखेड तालुक्यात ७ जिल्हा परिषद गटाची निर्मिती करण्यात आली आहे. दोन वर्षांपूर्वी जिल्हा परिषद गट रचनेमध्ये मुखेड तालुक्यांमध्ये ८ जिल्हा परिषद गट होते.

१४ जुलैला केलेल्या रचनेमध्ये दापका (गुंडोपंत) हा नव्याने केलेला निर्माण केलेला गट रद्द करण्यात आला आहे.दि.२९ जुलै २०२२ रोजी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांनी पत्रक काढून जिल्हा परिषद गटाचे आरक्षण जाहिर केले. ज्यामध्ये मुखेड तालुक्यात दापका (गुं.) या नवीन गटाच्या आरक्षण सोडतीसह ८ गटाची निर्मिती करुन आरक्षण सोडत केले होते. परंतु आता तो गट अचानक रद्द करण्यात आला आहे. मुखेड तालुक्यात ८ जिल्हा परिषद गट होतात,तिथे ७ जिल्हा परिषद गट करणे बेकायदेशीर आहे म्हूणन ते रद्द करून दापका (गु) गटासह मुखेड तालुक्यात ८ गट कायम ठेवावेत अशा लेखी आक्षेप शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दि. २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड व तहसील कार्यालय मुखेड येथे घेतला आहे.

१४ जुलै २०२५ च्या नवीन रचनेत पूर्वीच्या रचनेनुसार मुखेड तालुक्यात १ गट कमी करून ७ गट केले आहेत. १ गट कोणत्या नियमाने कमी केला? दोन वर्षांपूर्वी म्हणजे २७ जुलै २०२२ रोजी जी गट रचना करून आरक्षण सोडत केली होती,ती कायम ठेवावी. ज्यामध्ये मुखेड तालुक्यात दापका गु. गटासह ८ जिल्हा परिषद गटाचा समावेश झाला पाहिजे.अशी मागणी लेखी दिलेल्या आक्षेपात कलंबरकर यांनी केली आहे.

# गरजु घरकुल लाभार्थ्यांची यादी त्वरित शासन स्तरावर मंजूर करा : मुजीब पठाण



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२३ जुलै -**

मुदखेड शहरातील गरजू नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी दि. २२ जुलै रोजी शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुजीब पठाण यांच्या नेतृत्वात नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक शैलेश फडसे यांची भेट घेऊन शहरातील प्रलंबित नवीन डीपीआर आराखडा तयार करून घरकुल योजनेतील गरजू असलेल्या लाभार्थ्यांची यादी त्वरित शासन स्तरावर मंजूर करून घेण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करत घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नगरपरिषदेत वारंवार त्यांच्या अधिकारासाठी व न्यायासाठी पाठपुरावा कर अशी भूमिका शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुजीब पठाण यांनी व्यक्त केली.

या निवेदनाद्वारे अशी मागणी करण्यात आली की गरजू घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना डी पी आर मध्ये आपले नाव समाविष्ट करण्यासाठी अनेक कागदपत्रांची पूर्तता तर करावी लागत आहे पण नवीन डीपीआर आराखडा तयार करून केंव्हा शासन स्तरावर तांत्रिकदृष्ट्या मंजूर करून घेण्यात येईल अशी अपेक्षा गरजू घरकुल योजनेतील लाभार्थी करत असताना दिसत आहे.

यावेळी शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अविनाश चौदंते,वेदांत शेवटे आणि शहर युवक सचिव आकाश सोनटक्के, यासह आदि काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## रापम महामंडळात प्रशिक्षणार्थी उमेदवारांची भरती

**तभा वृतसेवा**
**माहूर दि.२३ जुलै -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागात सन २०२५-२६ या द्वितीय सत्रासाठी वेगवेगळ्या व्यवसायासाठी प्रशिक्षणार्थी ९४ शिकाऊ उमेदवारांसाठी भरती करण्यात येणार आहे. या शिकाऊ उमेदवार भरतीत नांदेड जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण किंवा व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व टो इंजिनिअरींग टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण उमेदवारांची भरती करण्यात येणार आहे.

# लाभार्थ्यांनी आपले खाते, आधार, संपर्क क्रमांक लिंक करून घ्यावे : सुरेखा नांदे

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२३ जुलै -**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या जनकल्याणकारी योजनेच्या लाभ घेणाऱ्या हदगाव तालुक्यातील काही लाभार्थ्यांनी आतापर्यंत खात्याशी आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक लिंक नसल्याकारणाने डीबीटी प्रणालीनुसार अनुदान जमा होत नसल्याचे निदर्शनास आल्याने तालुक्यातील लाभार्थ्यांनी ( लाभार्थी संख्या ६८ ) त्वरित आपले खाते, आधार, संपर्क क्रमांक लिंक करून घेण्याचे तसेच आपले इ. आधार कार्ड संपर्क क्रमांक घेऊन संजय गांधी विभागाशी संपर्क करण्याचे आव्हान तहसीलदार सुरेखा नांदे यांनी केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या योजना ज्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना , श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेचे अनुदान डिसेंबर २०२४ पासून डी.बी.टी. मार्फत थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होत आहेत परंतु हदगाव तालुक्यातील ६८ लाभार्थ्यांनी आतापर्यंत आपले खाते आधार क्रमांकाची व मोबाईल क्रमांकाची लिंक नसल्याने त्यांच्या अनुदान थांबले असून लाभार्थ्यांनी लवकरात-लवकर लिंक करून घ्यावे व संजय गांधी विभागाशी संपर्क त्वरित करण्याचे आव्हान तहसीलदार हदगाव सुरेखा नांदे यांनी केले आहे.

# सोनापीर बाबा दर्गाहची दुरुस्ती होण्याचा मार्ग मोकळा; पुरातत्व विभागाने केली केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२३ जुलै -**

माहूर शहरातील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या बाबा सोनापीर दर्गाह या पौराणिक वास्तूची दुरुस्ती करावी अशी मागणी दर्गाह चे मुतवल्ली शेख बाबर फकीर मोहम्मद यांनी संचालक डॉ तेजस मार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती याची दखल घेत संचालकांनी सहाय्यक संचालक अमोल गोटे यांचे सह कलेक्टिव्ह प्रॅक्टिस कंपनीच्या नागपूर येथील आर्किटेक्ट आणि पुरातत्व विभागाचे कंत्राटदार वैजनाथ फड मामा यांचे सह सोनापीर बाबा दर्गाहच्या दुरुस्तीसाठी दि २२ रोजी पाहणी केली सोबतच शहरातील पुरातत्व विभागा कडे असलेल्या सर्व वास्तूंची पाहणी केल्याने भाविका सह नागरिक आणि दर्गाह कमिटी कडून समाधान व्यक्त होत आहे.

माहूर शहरात असलेल्या बाबा सोनापीर दर्गाह ची ख्याती सर्व दूर पसरलेली असल्याने येथे वर्षभरात लाखोच्या संख्येने सर्व धर्मीय भाविक मोठ्या श्रद्धेने नतमस्तक होण्यासाठी येत असतात तर मार्च महिन्यात सालाना उर्स चे आयोजन होत असल्याने या उरसात कवाली चे कार्यक्रम सर्वधर्मीय कार्यक्रम कुस्त्यांच्या दंगली मनोरंजनाची साधने आणि सर्व वस्तू मिळण्याची दुकाने लागत असल्याने उर्सा च्या पाच दिवसात पाच लाखावर भावीक येथे येतात तर दर महिन्याच्या पाच तारखेला छोटा ऊर्स भरत असल्याने यावेळी हजारोच्या संख्येने भावीक येतात. त्यामुळे सोनाबीर बाबा दर्गाहाचा १९ एकर चा परिसर अद्यापही भकासच असल्याने मुतवल्ली बाबर भाई यांनी सर्व संबंधिताकडे सोनापीर बाबा दर्गाहाच्या मुख्य इमारती मधून पावसाळ्यात पाणी गळत असल्याने त्या इमारतीची दुरुस्ती करावी आणि परिसरातील विकास कामासाठी १०० कोटीचा निधी मिळावा अशी मागणी केली होती याची



दखल घेत पुरातत्व विभागाचे संचालक डॉ तेजस गर्गे यांनी नांदेडचे सहाय्यक संचालक अमोल गोटे यांना पत्र देऊन तात्काळ पाहणी करत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याने त्यांनी येथे भेट देऊन पाहणी केली

यावेळी पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक नांदेड अमोल गोटे कंत्राटदार वैजनाथ फड मामा कलेक्टिव्ह प्रॅक्टिस कंपनीच्या आर्किटेक्ट शिवानी शर्मा देवेश चींधे कर्मचारी सय्यद मसूद अन्सारी पहारेकरी दिनेश कोंडे राखणदार सय्यद आजम यांचे सह कर्मचारी उपस्थित होते.

# रेल्वे अंडरब्रिज समस्येच्या सोडवणुकीसाठी आ. भिमराव केराम यांचे यशस्वी प्रयत्न

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२३ जुलै -**

शहरातील शिवाजी नगर परिसरातील रेल्वे अंडरब्रिज संदर्भातील दीर्घकालीन समस्या सोडवण्यासाठी आमदार भिमराव केराम यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. या संदर्भातील तक्रार त्यांनी केंद्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे सादर केली होती. त्याअनुषंगाने दिनांक २६ जून रोजी झालेल्या सुनावणीनंतर आयोगाच्या आदेशानुसार संबंधित यंत्रणेसह आ. केराम यांनी २८ जून रोजी घटनास्थळी पाहणी केली होती.

या पाहणी अहवालाच्या आधारे आयोगाने संबंधित रेल्वे प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दिनांक २२ जुलै रोजी दिल्ली येथे झालेल्या पुढील सुनावणीत आ. भिमराव केराम, सहाय्यक जिल्हाधिकारी जेनिस चंद्र दोंतुला, सिकंदराबाद येथील रेल्वेचे मुख्य अभियंता, व नांदेड विभागीय कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी रेल्वे प्रशासनाने कबूल केले की, या भागातील रहदारीची व बोगद्याच्या आवश्यकतेची अचूक कल्पना प्रशासनाला पूर्वी झाली नव्हती. परिणामी, चुकीच्या जागी कमी रुंदीचा अंडरब्रिज तयार करण्यात येत होता. मात्र,



आमदार केराम यांनी सूचविलेल्या जागेवर, जिथे पूर्वी रेल्वे फाटक होते, तेथे नव्याने ३ मीटर रुंदीचा अंडरब्रिज तयार करण्यास प्रशासनाने मंजुरी दिली आहे. तसेच सध्या सुरू असलेले अपूर्ण अंडरब्रिजचे काम तात्काळ पूर्ण करून रहदारीस खुलं करावं, अशीही सूचना देण्यात आली आहे. शिवाय, या भागातून उड्डाणपूल (फ्लायओव्हर) उभारण्याच्या शक्यतेचा अभ्यास करण्यासाठी तातडीने सर्वेक्षण सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे शिवाजी नगर व स.वि.म. परिसरातील रहिवाशांच्या दीर्घकालीन समस्येवर तोडगा निघाला असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या महत्त्वपूर्ण यशामुळे आ. भिमराव केराम यांचे सामाजिक व नागरी प्रश्नांवरील सक्रिय योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीकडे लक्ष

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.२३ जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांच्या निवडी झाल्यानंतर भोकर विधानसभा मतदार संघातील तिन्ही तालुक्यातील तालुका व शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्या आहेत. आता सर्वांचे लक्ष युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदा कडे लागले आहे.





अर्धापूर शहरातील भारतीय जनता पार्टीचे कट्टर, निष्ठावंत, एकनिष्ठ, कार्यकर्ते माजी नगरसेवक तुकाराम साखरे व युवा कार्यकर्ते अभिषेक गुरखेल हे दोघेजण भाजपा युवा मोर्चाच्या नांदेड जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक आहेत. यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण,भोकर विधानसभेच्या आमदार ॲड. श्रीजया चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या गाठीभेटी घेणे सुरू केले आहे.युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदी कोणाची वर्णी लागणार याकडे नांदेड लोकसभा व भोकर विधानसभा मतदार संघाचे लक्ष लागले आहे.

# शाळकरी विद्यार्थीनींनी केले बससाठी आंदोलन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२३ जुलै -**

तालुक्यातील शाळकरी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेत, कॉलेज व इतर शैक्षणिक संस्थेत जाण्याकरिता स्वतंत्र बसची मागणी पूर्ण करण्याकरिता आज सकाळी तामसा रोडवर श्री दत्त कॉलेज जवळ आंदोलनाचा पवित्रा घेतला तर यामुळे महामंडळ प्रशासनास खडबडून जागे होत आगार व्यवस्थापक यांनी आपल्या प्रतिनिधीस पाठवून विद्यार्थिनीचे मागणी लक्षात घेता लवकरच आपल्यासाठी स्वतंत्र बसची व्यवस्था करण्यात येईल असे लेखी पत्र देऊन त्या विद्यार्थिनींचे आंदोलन स्थगित करण्यात आले. यामुळे तामसा रोडवर काही काळ वाहतूकीचा बोजवारा उडाला होता.



एकीकडे महाराष्ट्र शासन हे मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून मुलींचे शिक्षण थांबू नये यासाठी प्रयत्नशील असते पण त्यास अपवाद हदगाव महामंडळाच्या गळथान कारभार ठरला असून याची प्रचिती आज हदगाव तालुक्यातील हरडफ येथील मुलींना येत आहे. त्यांना कॉलेज व शाळेत व इतर शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेण्यासाठी स्वतंत्र बस नसल्याकारणाने आज या मुलींनी आक्रमक पवित्र घेत श्री दत्त कॉलेज जवळ बस अडवून आंदोलन सुरू केले होते यामुळे आगार व्यवस्थापकाचे धाबे चांगलेच दणाणले होते त्यांनी त्वरित आपल्या प्रतिनिधीस पाठवून आपले मागण्या पूर्ण होईल असे आशयाचे पत्र देऊन या मुलींचे आंदोलन थांबवले.